


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा


रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २७.१०.२०२६ | अंक नं. १७६ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020



















- द्वितीय पुण्यस्मरण -

मायेचा हात डोक्यावर नाही! प्रेमळ शब्दांची साथ नाही!!
आठवणी मात्र सोबत आहेत! डोळ्यांत अश्रू दाटवत आहेत!!

## भावपूर्ण श्रध्दांजली



## स्व. अभय बाबासाहेब बोरुडे

28 ऑक्टोबर 2024

श्रीमती वैशाली अभय बोरुडे
श्री. युवराज अभय बोरुडे । सौ. अंजली आदेश जाधव । कु.संस्कृती अभय बोरुडे
श्री. आनंद बाबासाहेब बोरुडे
श्री. सुनील बाबासाहेब बोरुडे
श्री. सचिन बाबासाहेब बोरुडे

**समस्त बोरुडे परिवार**










जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जुन्या वादातून तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला; भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - भिंगार शहरात जुन्या वादातून एका तरुणाला रस्त्यात अडवून त्याच्यावर लोखंडी कोयत्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरदीन खलील शेख (वय २२, रा. सदर बाजार, भिंगार) असे जखमी तरुणाचे नाव असून त्याने दवाखान्यात उपचार सुरु असताना दिलेल्या जबाबावरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरदीन शेख हा तरुण २४ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास बाबा पान सेंटर विजयलाईनकडून आपल्या नवीन घरी आलमगीर येथे पायी चालला होता. तो जलसा हॉटेल जवळ आला असता, त्याच्या पाठीमागून एच.एफ. डीलक्स मोटारसायकलवरून लखन साळवे आणि सॅम गोहेर हे दोघे तिथे आले. लखन साळवे याने फरदीनला जलसा हॉटेलजवळ थांबायला सांगितले.

फरदीनने थांबून काय झाले हे विचारण्यासाठी त्यांच्या मोटारसायकलजवळ गेला असता, पाठीमागे बसलेल्या लखन साळवे याने आपल्या हातातील लोखंडी कोयत्याने फरदीनच्या डाव्या कानाजवळ व डाव्या खांद्यावर वार करून त्याला गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर आरोपी तिथून निघून गेले. त्यानंतर तिथे जवळच असलेला फरदीनचा भाऊ फुरखान खलील शेख याने त्याला मोटारसायकलवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात नेले. तेथून वैद्यकीय चिठ्ठी घेऊन त्याला उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले, त्यानंतर पुढील उपचारासाठी त्याला खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी फरदीन खलील शेख याने दिलेल्या जबाबावरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात लखन साळवे (रा. प्रबुद्धनगर, भिंगार) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११८ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाणीपुरवठा व्यवस्थेवर ताण येण्याची शक्यता गृहीत धरून उपनगरांतील नव्या जलवाहिन्यांना तात्पुरती स्थगिती

नगर - यावर्षी अत्यंत कमी पाऊस झाल्याने ऑक्टोबर महिन्यातच पाणीटंचाईचे संकट जाणवू लागल्याने पाणीपुरवठा व्यवस्थेवरील संभाव्य ताण लक्षात घेऊन नव्याने विकसित होणाऱ्या भागांमध्ये विकासक किंवा जागामालकांना स्वखर्चाने नवीन जलवाहिन्या टाकण्यासाठी महापालिकेकडून तूर्तास परवानगी दिली जाणार नाही. शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना बोल्हेगाव, नागापूर, कल्याण रोड, तपोवन रोड, केडगाव आणि बुरुडगाव रोड या उपनगरांमध्ये नव्या वसाहती आणि बहुमजली इमारतींची उभारणी सुरू आहे. या निर्णयामुळे या भागांत नवीन घर घेतलेल्यांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे.

ज्या भागांमध्ये यापूर्वी कोणतीही पाणी वितरण व्यवस्था अस्तित्वात नाही, अशा ठिकाणी नवीन जलवाहिन्या टाकण्यास परवानगी देऊ नये, असे पाणीपुरवठा विभागाने सर्व प्रभाग कार्यालयांना यासंदर्भात निर्देश जारी केले आहेत. मात्र, ज्या भागांमध्ये आधीपासून पाणी वितरण व्यवस्था कार्यरत आहे, तेथे नियमानुसार नवीन जलवाहिन्या टाकण्यास परवानगी दिली जाणार आहे.

पिण्याच्या पाण्याची मागणी सातत्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाणीसाठा आणि विद्यमान वितरण व्यवस्थेची क्षमता लक्षात घेऊन पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याचे आव्हान महापालिकेसमोर आहे. नव्याने विकसित होणाऱ्या भागांमध्ये स्वतंत्रपणे जलवाहिन्या टाकण्यास मोठ्या प्रमाणावर परवानगी दिल्यास उपलब्ध पाण्याचे नियोजन बिघडण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. त्यामुळे सद्यस्थितीतील पाण्याची उपलब्धता, विद्यमान जलवाहिन्यांची क्षमता आणि वितरण व्यवस्थेचा विचार करून नवीन जलवाहिन्यांच्या परवानग्यांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. पुढील आदेश मिळेपर्यंत ही स्थगिती कायम राहणार आहे. त्यामुळे नव्याने विकसित होणाऱ्या वसाहतींमध्ये पाणीपुरवठ्याची व्यवस्था उभारू इच्छिणाऱ्या विकासक आणि जागामालकांना महापालिकेच्या पुढील निर्णयाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# दुष्काळाचा आठवडे बाजारावर परिणाम

## बाजारात आवक घटल्यामुळे भाजीपाला महागला



यंदा दुष्काळाच्या झळा तीव्र होत असल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे. त्याचा परिणाम वाळकी, गुंडेगाव येथील आठवडे बाजारांवर झाला आहे. यामध्ये भाजीपाला आवक कमी आणि मागणी जास्त असल्यामुळे कोथिंबीर, मेथी, टोमॅटो, गवार, हिरवी मिरची, कांदे यांसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे भाव गगनाला भिडले.

नगर - यंदा दुष्काळाच्या झळा तीव्र होत असल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे. त्याचा परिणाम वाळकी, गुंडेगाव येथील आठवडे बाजारांवर झाला आहे. यामध्ये भाजीपाला आवक कमी आणि मागणी जास्त असल्यामुळे कोथिंबीर, मेथी, टोमॅटो, गवार, हिरवी मिरची, कांदे यांसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे भाव गगनाला भिडले असल्याने या परिस्थितीत बाजारासाठी बाहेर पडणाऱ्या ग्राहकांची संख्या कमी झाली आहे.

वाढत्या किमतींमुळे गरीब आणि मध्यमवर्गीय ग्राहकांना भाजीपाल्याची खरेदीवर मर्यादित खर्च केला जात आहे.दुष्काळामुळे पिके जळून खाक झाली असून शेतकऱ्यांचे उत्पन्न शून्य झाले आहे. हातात पैसा नसल्यामुळे शेतकरी आणि शेतमजूर आठवडे बाजारात खरेदीसाठी येत नाहीत.एरवी गजबजणाऱ्या तसेच प्रामुख्याने प्रसिद्ध असलेल्या वाळकी आठवडे बाजारात शांतता व अल्प गर्दी दिसून आली तर कपडे, भांडी, चपला आणि इतर घरगुती वस्तूंच्या दुकानांना ग्राहक मिळत नसल्याची अवस्था झाली आहे.

ग्रामीण भागात प्रामुख्याने भाजीपाला, फळे, किराणा, मसाले, कपडे आणि घरातील वस्तू खरेदीसाठी व कुटुंबीयांसाठी खाऊ यासाठी आठवडे बाजाराला पसंती असते. मात्र यंदा हा फटका बसत असल्याने बाजारावर मंदीचे सावट आहे.सकाळी ९ पासून उन्हाचा चटका जाणवत असल्याने आठवडे बाजारात ग्राहक बाजारात फिरकत नाहीत. त्यामुळे सकाळी ११ पर्यंत व दुपारी चारनंतर गर्दी होते. मात्र उन्हाच्या तीव्रतेमुळे ग्राहक संख्या घटल्याने ग्रामीण अर्थकारण अडचणीत सापडण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे बाजारात होणारी उलाढाल निम्म्यावर आली असल्याची स्थिती आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अर्थकारण सध्या मंदीत सापडल्याचे परिणाम स्पष्टपणे दिसू लागले आहेत. यामुळे यंदाचे दुष्काळाचे सावट अडचणी वाढविणारे आहे.

### शेतकऱ्यांचे अर्थकारण अडचणीत

गतवर्षी झालेल्या कमी पावसामुळे यंदा विहिरींनी तळ गाठला आहे. परिणामी भाजीपाला लागवडी घटलेल्या आहेत. या बरोबरच ज्या ठिकाणी भाजीपाला लागवडी आहेत. त्या ठिकाणी तापमानाच्या वाढीमुळे त्या अडचणीत आल्या आहेत. अशा परिस्थितीत बाजारात स्थानिक ठिकाणी भाजीपाल्याची उपलब्धता कमी आहे. याशिवाय शेतीवर उदरनिर्वाह असणारे शेतमजूर व शेती उत्पन्नातून उलाढाल करणारे शेतकऱ्यांचे अर्थकारण अडचणीत आल्याने शांतता पाहायला मिळत आहे. त्याचा परिणाम आठवडे बाजारांवर झाला आहे, असे गृहीणी रेश्मा आगळे यांनी सांगितले.

यंदा दुष्काळाच्या झळा तीव्र होत असल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे. त्याचा परिणाम वाळकी, गुंडेगाव येथील आठवडे बाजारांवर झाला आहे. यामध्ये भाजीपाला आवक कमी आणि मागणी जास्त असल्यामुळे कोथिंबीर, मेथी, टोमॅटो, गवार, हिरवी मिरची, कांदे यांसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे भाव गगनाला भिडले.

### भाजीपाल्यांचे दर

भाजीपाला किलोच्या दरामध्ये घ्यायचा झाल्यास पुढील प्रमाणे दर बाजार आहेत. मेथी- ४० रुपये जुडी, कोथिंबीर - ४० जुडी,हिरवा शेपू,- ४०,शेवगा -८०, टोमॅटो- ४०, दोडका- ६०,वांगी- ६०, कारली- ५० ते ६०, ढोबळी मिरची- ४०, मिरची - ८०, फ्लॉवर- ४०, कोबी- ३०, बटाटा- २५ ते ३०, कांदा - ५०, लसूण-१२०, भेंडी- ६० अन्य पालेभाज्या २० ते २५ रूपये दराने मिळत आहे.

# 'मुळा'च्या उजव्या कालव्यातून एक, तर डाव्यातून दोन आवर्तने

## कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय



नगर - मुळा उजवा कालव्यातून बंधाऱ्यांना, पिण्याच्या पाण्यासाठी जानेवारी ते मार्च २०२७ या कालावधीत एक आवर्तन तसेच मुळा डावा कालव्यातून जानेवारी ते मार्च २०२७ या कालावधीत दोन आवर्तने सोडण्यात येणार आहे. त्यातील एक शेतीसाठी व एक पिण्याच्या पाण्यासाठी सोडण्यात येणार आहे. मुळा प्रकल्पातील उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने आणि कार्यक्षम वापर करण्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे सूक्ष्म नियोजन करावे. पाणी वितरणात कार्यक्षमता वाढवून पाण्याचा अपव्यय टाळण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. मुळा प्रकल्प कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत मंत्री विखे बोलत होते.

बैठकीस आमदार प्राजक्त तनपुरे, विठ्ठल लंघे, हेमंत ओगले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर धनंजय जाधव, अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत प्रकल्पातील पाणीवापराचे नियोजन, कालव्यांव्दारे पाणी वितरण आणि उपलब्ध जलसाठ्याच्या कार्यक्षम वापराबाबत चर्चा करण्यात आली. रब्बी हंगामात पाण्याची गरज लक्षात घेऊन वितरणाचे नियोजन करण्यावरही भर देण्यात आला. पाण्याचे महत्त्व लक्षात घेता उपलब्ध जलसाठ्याचा योग्य विनियोग होणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी नियोजनबध्द पध्दतीने काम करावे. पाणी वितरणाच्या प्रक्रियेत विविध विभागांमध्ये समन्वय राखून उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त योग्य उपयोग होईल, याची दक्षता घ्यावी, असेही मंत्री विखे यांनी स्पष्ट केले.

बैठकीत अधीक्षक अभियंता शेटे आणि कार्यकारी अभियंता पाटील यांनी सादरीकरणाव्दारे मुळा प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र, लाभक्षेत्रातील पर्जन्यमान, सन २०२६-२७ मधील खरीप हंगामातील पाणीवापर आणि आगामी पाणी नियोजनाची सविस्तर माहिती दिली. मुळा उजवा कालव्यातून बंधाऱ्यांना, पिण्याच्या पाण्यासाठी जानेवारी ते मार्च २०२७ या कालावधीत एक आवर्तन तसेच मुळा डावा कालव्यातून जानेवारी ते मार्च २०२७ या कालावधीत दोन आवर्तने सोडण्यात येणार आहे. त्यातील एक शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी सोडण्यात येणार असल्याचे सांगितले.

# ग्रामपंचायत कार्यालयात कामगार महिलेचा खून



अनिता आळकुटे (मयत)

नगर - भिंगार जवळील वडारवाडी ग्रामपंचायत कार्यालयातच सफाई कामगार महिलेचा डोक्यात लोखंडी वस्तूने प्रहार करत निर्घृण खून करण्यात आल्याची घटना २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घडली. अनिता देविदास आळकुटे (वय ४२) असे मयत महिलेचे नाव आहे. या प्रकरणी संशयित आरोपी संतोष नाना धोत्रे (वय ४९) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

वडारवाडी ग्रामपंचायतीवर सध्या प्रशासक आहे. या ग्रामपंचायतीत सफाई कामगार म्हणून अनिता आळकुटे ही महिला काम करत होती. तर ग्रामपंचायतच्या कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीवर संतोष धोत्रे हा चालक म्हणून काम करत होता. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी या दोघांमध्ये कुठल्यातरी कारणावरून वाद झाले. या वादात संतोष धोत्रे याने ग्रामपंचायत कार्यालयातच पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी सोडण्याचा लोखंडी हँडल तिच्या डोक्यात मारला. त्यामुळे ती गंभीर जखमी होवून रक्ताच्या थारोळ्यात पडली. या घटनेची माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या स.पो.नि. तेजश्री थोरात आणि पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

या हल्ल्यामध्ये गंभीर जखमी झालेल्या महिलेला उपचारासाठी तात्काळ जिल्हा रुग्णालय या ठिकाणी हलवण्यात आले. मात्र रुग्णालयात पोहचण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने न्यायवैद्यकीय पथकाला घटनास्थळी बोलावून घेतले आहे. न्यायवैद्यकीय पथकाच्या माध्यमातून सध्या घटनास्थळावरील जागेचा सखोल पंचनामा करण्याचे काम सुरू करण्यात आले.

या गुन्ह्यामध्ये संशयित आरोपी असणाऱ्या संतोष धोत्रे याला भिंगार कॅम्प पोलिसांनी तातडीने आपल्या ताब्यात घेतले आहे. प्राथमिक चर्चेनुसार चारित्र्याच्या संशयावरून किंवा वैयक्तिक वादातून हा खून झाला असावा अशी चर्चा आहे.मात्र या हत्येचे नेमके आणि अचूक कारण काय असावे हे अद्याप पोलिसांकडून अधिकृतपणे स्पष्ट झालेले नाही.

घटनेची माहिती वाऱ्यासारख्या पसरताच वडारवाडी ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरामध्ये नागरिकांनी एकच गर्दी केली होती. दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.

# शहरातील बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाई करा

## आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवकांचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन



शहरातील बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांना देताना महापौर ज्योतीताई गाडे, आ.संग्राम जगताप व नगरसेवक.

नगर - शहरातील प्रेमदान चौक परिसरात झालेल्या भीषण अपघातात युवा क्रिकेटपटू यश अविनाश जाधव याचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनेनंतर शहरातील बेशिस्त वाहतूक आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेऊन निवेदन दिले. संबंधित टँकर चालकावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अवजड वाहनांची आवश्यक कागदपत्रे व तांत्रिक स्थिती तपासावी आणि शहरात वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

या वेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपसभापती वर्षाताई सानप, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक करण कराळे, प्रकाश भागानगरे, पुष्कर कुलकर्णी, निखिल वारे, मनोज दुल्लम, बाळासाहेब पवार, प्रा. माणिकराव विधाते, महेश लोंढे, सुरेश बनसोडे, संदीप आडोळे, रोहन सानप, मोहित पंजाबी, दत्ता गाडळकर, सोमनाथ जाधव आदी उपस्थित होते.

नगरसेवक करण कराळे यांनी निवेदनात म्हटले की, दोन दिवसांपूर्वी झालेल्या टँकरच्या अपघातात युवा क्रिकेटपटू यश अविनाश जाधव याला आपला जीव गमवावा लागला. ट्रॅक्टर चुकीच्या दिशेने येऊन धडकल्याने हा अपघात झाल्याचे त्यांनी सांगितले. या दुर्दैवी घटनेमुळे शहरातील बेशिस्त वाहतुकीचा प्रश्न किती गंभीर बनला आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

शहरातील रस्त्यांवर वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून वाहन चालविण्याचे प्रकार घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. भविष्यात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण कराळे यांनी केली.

नगरसेवक निखिल वारे यांनी शहरातील वाहतूक व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करताना वाहनचालकांकडून, विशेषतः अवजड वाहनांच्या चालकांकडून, वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा आरोप केला. चुकीच्या दिशेने वाहन चालविणे, दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने जाणे तसेच नंबर प्लेट नसलेली वाहने रस्त्यावर धावणे, असे प्रकार निदर्शनास येत असल्याचे त्यांनी सांगितले.

टँकरसारखी अवजड वाहने रस्त्यावर धावत असताना त्यांची आवश्यक कागदपत्रे, फिटनेस प्रमाणपत्र आणि विमा वैध आहे की नाही, याची नियमित तपासणी होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रेमदान चौकातील अपघाताशी संबंधित टँकरची कागदपत्रे आणि तांत्रिक स्थिती तपासण्यात यावी. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत वाहतूक पोलिसांनी अधिक गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी निखिल वारे यांनी केली.

प्रेमदान चौकातील अपघातामुळे शहरातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. निष्काळजी वाहनचालकांवर कठोर कारवाई, अवजड वाहनांची नियमित तपासणी आणि वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास भविष्यात अशा दुर्दैवी घटना टाळण्यासाठी ठोस पावले उचलता येतील, अशी भूमिका नगरसेवकांनी मांडली.

दरम्यान, या प्रकरणाची संबंधित प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी तातडीने दखल घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, तसेच शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# अशोक जिंदम यांचे अल्प आजाराने निधन



नगर - माधवनगर कल्याण रोड येथील रहिवासी अशोक भुमय्या जिंदम (वय ७०) यांचे २६ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ४ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. साईराम जिंदम यांचे ते वडील होत.

# चांगदेव पवार यांचे अल्प आजाराने निधन



नगर - कौडगाव जाम येथील रहिवासी चांगदेव नाना पवार (वय ८०) यांचे २४ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कौडगाव जाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले

त्यांच्या मागे ३ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

# पोलिसांकडे तक्रार केल्याने केडगावमध्ये महिलेवर लोखंडी रॉड आणि विटांनी हल्ला

नगर - केडगाव परिसरातील विठ्ठल पार्क येथे जुन्या तक्रारीचा राग धरून महिलेला व तिच्या अल्पवयीन मुलीला रस्त्यात अडवून शिवीगाळ करत लोखंडी रॉड आणि विटांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मिनीगंठण हिसकावून नेण्यात आले असून मोबाईल व स्कूटीचेही नुकसान करण्यात आले आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत राणी दादा जगताप (वय ३४, रा. नेप्ती रोड, विठ्ठल पार्क, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास मुलीसह स्कूटीवरून घरी येत होत्या. त्यावेळी त्यांच्या घरासमोर राहणारी शारदा सोनवणे आणि तिचा मुलगा विवेक दुसाने यांनी चौकात त्यांची गाडी अडवली. यापूर्वी दिलेल्या पोलिसांतील तक्रारीवरून वाद घालत त्यांनी तक्रार मागे घेण्यासाठी धमकी देऊन शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर शारदा सोनवणे हिने फोन करून विनायक दुसाने आणि एका अनोळखी इसमाला तेथे बोलावून घेतले. विनायक दुसाने याने तेथे पडलेल्या लोखंडी रॉडने राणी यांच्या पाठीवर व डोक्यात मारहाण करून त्यांना बांधकामाच्या ठिकाणी ढकलले, तर शारदा सोनवणे व अनोळखी इसमाने विटांनी मारहाण केली.

घटनेचे व्हिडिओ शूटिंग करणाऱ्या मुलीचा मोबाईल हिसकावून तिलाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच स्कूटीची तोडफोड केली. या मारहाणीदरम्यान शारदा सोनवणे या महिलेने राणी यांच्या गळ्यातील सोन्याचे मिनीगंठण हिसकावून घेतले आणि ट्रॉसिटीची खोटी केस दाखल करण्याची व जीवे मारण्याची धमकी दिली. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या राणी जगताप यांच्यावर अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात शारदा सोनवणे, विवेक विनायक दुसाने, विनायक दुसाने (सर्व रा. विठ्ठल पार्क, केडगाव) व एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या १० गोवंशीय जनावरांची मुक्तता, दोघा जणांना अटक



नगर -अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंदे आणि गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई सत्र सुरू ठेवले आहे. संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत छापा टाकून पोलिसांनी कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवलेली तब्बल ३ लाख ४० हजार रुपये किमतीची १० गोवंशीय जनावरे मुक्त केली आहेत. या प्रकरणी दोन आरोपींना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी अवैध व्यावसायिकांची माहिती काढून कारवाई करण्यासाठी विशेष पथक रवाना केले होते. २७ ऑक्टोबर रोजी हे पथक संगमनेर शहर परिसरात गस्तीवर असताना, कादरीनगर गल्ली क्रमांक २ मधील मस्जिदे गौसो रजा समोरील मोकळ्या जागेत आणि म्हसोबा मंदिराजवळ जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली.

प्राप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष संबंधित ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी तेथे १० गोवंशीय जनावरे अत्यंत निर्दयीपणे डांबून ठेवल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आदनान असिफ सय्यद (वय २८, रा. देवीगल्ली, मोगलपुरा, संगमनेर) आणि अनस सरवर कुरेशी (वय २४, रा. हावडा ब्रिज, संगमनेर) या दोघांना घटनास्थळावरून ताब्यात घेतले.

या प्रकरणी दोन्ही आरोपींविरोधात संगमनेर शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम आणि प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध करणाऱ्या कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेली जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### डोळ्यांना द्या आराम

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, संगणक, टीव्ही आणि टॅब्लेट आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. काम ाच्या ठिकाणी तासनतास पडद्यासमोर बसणे असो किंवा मोकळ्या वेळेत मोबाईलवर चित्रे आणि माहिती पाहणे असो, आपला बहुतांश वेळ इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या पडद्याकडे पाहण्यातच जातो. परंतु, या पडद्याकडे सतत आणि जास्त वेळ पाहत राहिल्यामुळे आपल्या डोळ्यांवर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत आहे. या समस्येला आजकाल डोळ्यांवरील ताण किंवा संगणकीय दृष्टीदोष असे म्हटले जाते. या समस्येपासून डोळ्यांचे संरक्षण करण्यासाठी काही सोप्या आणि प्रभावी सवयींचा अंगीकार करणे आवश्यक आहे. काम करताना दर वीस मिनिटांनी वीस सेकंदांसाठी किमान वीस फ ूट दूर असलेल्या एखाद्या वस्तूवर लक्ष केंद्रित करावे. यामुळे डोळ्यांच्या स्नायूंना विश्रांती मिळते आणि त्यांच्यावरील ताण कमी होतो. काम करताना जाणीवपूर्वक डोळ्यांची उघडझाप करत राहावे, ज्यामुळे डोळ्यांमधील नैसर्गिक ओलावा टिकून राहतो आणि कोरडेपणा येत नाही. तसेच मोबाईल किंवा संगणकाचा पडदा डोळ्यांपासून किमान एक ते दीड फूट अंतरावर असावा आणि पडद्याचा प्रकाश खोलीतील प्रकाशाशी सुसंगत असावा. खूप अंधारात काम करणे किंवा अतिप्रकाशात बसणे नेहमी टाळावे. डोळ्यांचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी जीवनसत्त्व 'अ'युक्त पदार्थांचा आहारात समावेश करावा. गाजर, पालक, हिरव्या पालेभाज्या, दूध आणि फळांचे नियमित सेवन करावे आणि दिवसभरात मुबलक पाणी प्यावे. कामाच्या दरम्यान डोळे गोल फिरवणे, काही वेळ डोळे घट्ट बंद करून पुन्हा उघडणे आणि तळहातांची ऊब डोळ्यांवर ठेवणे यांसारखे सोपे व्यायाम डोळ्यांना त्वरित आराम देतात. तंत्रज्ञानाचा वापर पूर्णपणे थांबवणे आजच्या काळात शक्य नसले, तरी योग्य खबरदारी आणि वेळेचे नियोजन करून आपण आपल्या डोळ्यांचे आरोग्य नक्कीच जपू शकतो.

## पाककला

### व्हेज जयपुरी

**साहित्य :** पनीरचे तुकडे १ वाटी, बटाटा १ मध्यम (चौकोनी कापलेला), गाजर १/२, फरसबी १/२ वाटी, वाटाणा १/२ वाटी, शिमला मिरची १ (१ लहान), बारीक चिरलेला कांदा १ लहान, टोमॅटो प्युरी १ वाटी, आले-लसूण पेस्ट १ चमचा, काजू पेस्ट २ चमचे, फ्रेश क्रीम २ चमचे, तेल ३ चमचे, बटर १ चमचा, १/२ चमचा हळद, १ चमचा धने पावडर, १/२ चमचा जिरे पावडर, १ चमचा गरम मसाला, १/४ चमचा काळी मिरी पावडर, चवीनुसार मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

**कृती :** बटाटा, गाजर, फरसबी, वाटाणा थोडे मीठ घालून अर्धवट उकडून घ्या. कढईत तेल व बटर गरम करून त्यात कांदा परतून घ्या. त्यात आले-लसूण पेस्ट घालून परता. त्यात टोमॅटो प्युरी घालून तेल सुटेपर्यंत परता. त्यात हळद, धने पावडर, जिरे पावडर, गरम मसाला, काळी मिरी पावडर, मीठ घाला. त्यात काजू पेस्ट घालून एकजीव करा. त्यात उकडलेल्या भाज्या, शिमला मिरची व पनीरचे तुकडे घालून हलक्या हाताने मिक्स करा. गरजेनुसार थोडे पाणी घालून ५-७ मिनिटे मंद आचेवर शिजू द्या. वरून फ्रेश क्रीम व कोथिंबीर घालून मिक्स करा. तयार व्हेज जयपुरी नान किंवा पराठ्याबरोबर गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### शयनकक्ष विषयक

* शयनकक्षाच्या छताला (सीलिंग) नेहमी शुद्ध पांढरा रंग द्यावा, ज्यामुळे खोली मोठी वाटते.
* प्रसन्नतेसाठी रोज सकाळी ताजी गुलाबी किंवा पांढरी फुले ठेवावीत.
* पंखे, खिडक्या आणि कपाटाच्या वरील भागावर धूळ साचू देऊ नये. ती लगेच काढून टाकावी.

## सौंदर्य

* टोमॅटोचे काप चेहऱ्यावर चोळल्याने टॅनिंग आणि ब्लॅकहेड्स् दूर होतात.
* कॉफीचे क्यूब्स चेहऱ्यावर फिरवल्याने इन्स्टंट ग्लो मिळतो.

## सल्ला

कोणतेही गोड पदार्थ (जसे की खीर, शिरा) बनवताना त्यात चिमूटभर मीठ घातल्यास गोडी अधिक खुलून दिसते.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, कृत्तिका १३।२६, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी अनुकूल परिस्थिती राहील.

**वृषभ :** दिवसाची सुरुवात सकारात्मक होईल.

**मिथुन :** शिक्षण आणि स्पर्धा क्षेत्रात चांगले परिणाम साध्य कराल.

**कर्क :** व्यवसाय करणाऱ्यांसाठी दिवस विशेष फायदेशीर ठरेल.

**सिंह :** कष्टाचे योग्य फलित मिळाल्या मुळे आत्मविश्वासात वाढ होईल.

**कन्या :** नोकरी करणाऱ्यांच्या कामाचे कौतुक होईल.

**तूळ :** सामाजिक व व्यावसायिक संबंध मजबूत होतील.

**वृश्चिक :** शिक्षण व स्पर्धेशी संबंधित बाबींमध्ये यश मिळेल.

**धनु :** कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**मकर :** कुटुंबाशी संबंधित प्रश्न मार्गी लागतील.

**कुंभ :** मान-सन्मान आणि प्रतिष्ठा प्राप्त होईल.

**मीन :** मार्गदर्शनामुळे महत्त्वाची माहिती समजेल. रखडलेली कामे मार्गी लागतील.

## शब्दगंध क्र. ७५४५

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | ९ | | | |
| | ■ | ■ | १० | | ■ | ११ | |
| १२ | १३ | १४ | | ■ | १५ | ■ | |
| ■ | १६ | | | | | ■ | ■ |
| १७ | | | ■ | ■ | १८ | | १९ |
| | ■ | २० | २१ | | | ■ | |
| २२ | | ■ | | ■ | २३ | | |

**आडवे शब्द :-** १) विदर्भातील या प्रमुख शहराला महाराष्ट्राची उपराजधानी म्हटले जाते ४) पतीचे किंवा पत्नीचे वडील ७) एक झाड; वटवृक्ष ८) मधू या राक्षसाला मारले म्हणून श्रीकृष्णाचे असेही नाव पडले १०) चांदणी; नक्षत्र ११) श्रीमंत; सधन; धनवान १२) बोजवारा; वाताहत १६) सती जाणे १७) जिल्ह्याचे ठिकाण असलेले पश्चिम महाराष्ट्रातील एक शहर १८) सारखा; सम; बरोबर; पंचप्राणांपैकी एक २०) वाखाणणी; प्रशंसा २२) हजार किलो किंवा दहा क्विंटल वजनाचे माप २३) पाणी पिण्याची शारीरिक स्थिती; तृष्णा

**उभे शब्द :-** १) हिचे मीठ अळणी असते असे म्हणतात २) डोंगरी किल्ला ३) फिरस्ता; गोसावी ४) पतीची किंवा पत्नीची आई ५) अंगरखा; शर्ट वगैरे ६) रानटी; जंगली; वन्य ९) जबाबदारी; उत्तरदायित्व; श्रेष्ठ; अढळ १३) नसणारा; अनवश्य १४) इराणची राजधानी १५) झणझणीत; झोंबणारे; तिखट १७) सावली; छाया १९) प्रणाम; प्रारंभ; वंदन; सुरुवात २१) भाग; हिस्सा

### शब्दगंध क्र. ७५४४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | मे | शा | ■ | अ | व | ज | ड |
| की | ■ | क | च | रा | ■ | मा | ग |
| म | ध | ■ | व | ज | न | द्वा | र |
| ■ | न | ■ | ■ | क | म | र | ■ |
| आ | ग | म | न | ■ | क | ■ | शे |
| म | र | ग | ळ | ■ | ह | म | ला |
| द्वा | ■ | रू | ■ | वि | रा | ट | ■ |
| र | ब | र | ■ | ■ | म | का | न |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** ध्येय गाठायचे असेल, तर सुरुवात कोणत्याही परिस्थितीत आजच करावी लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### झाडांना पंप किंवा मोटर नसताना जमिनीतील पाणी थेट सर्वोच्च पानांपर्यंत कसे पोहोचते?

झाडामध्ये कोणत्याही मोटर किंवा पंपाशिवाय जमिनीतील पाणी थेट शंभर मीटर किंवा त्याहून अधिक उंच असलेल्या सर्वोच्च पानांपर्यंत कसे पोहोचते, हे कोडे विज्ञानाने उलगडले असले तरी निसर्गाचा हा चमत्कार थक्क करणारा आहे. आपण मानवी तंत्रज्ञानाचा विचार केला, तर एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर पाणी चढवण्यासाठी आपल्याला विजेचा वापर करून चालणाऱ्या मोठ्या आणि शक्तिशाली पंपांची गरज भासते. परंतु, निसर्गाच्या या अथांग साम्राज्यात उंचच उंच वृक्ष कोणत्याही मानवी ऊर्जेचा, यंत्राचा किंवा आवाजाचा वापर न करता रोज शेकडो लिटर पाणी जमिनीतून शोषून घेतात आणि ते अगदी शेंड्यापर्यंत पोहोचवतात. यामागे अत्यंत सूक्ष्म, शिस्तबद्ध आणि वैज्ञानिक भौतिक नियम कार्यरत असतात.

या प्रवासाची सुरुवात जमिनीच्या पोटात दडलेल्या मुळांपासून होते. झाडाची मुळे जमिनीतील मातीच्या कणांमध्ये पसरलेली असतात. ही मुळे केवळ झाडाला घट्ट धरून ठेवण्याचे काम करत नाहीत, तर मातीतील पाणी आणि त्यात विरघळलेली खनिजे शोषून घेतात. मुळांच्या सूक्ष्म पेशींमध्ये जेव्हा पाणी शिरते, तेव्हा तेथे पाण्याचा साठा वाढून एक नैसर्गिक दाब निर्माण होतो. हा दाब पाण्याच्या प्रवाहाला खोडाच्या आतील सूक्ष्म नलिकांमध्ये वरच्या दिशेने ढकलण्याचे सुरुवातीचे काम करतो. परंतु, हा दाब पाण्याचे लहान वनस्पतींमध्ये किंवा थोड्या उंचीपर्यंत वहन करू शकत असला, तरी गगनाला भिडणाऱ्या मोठ्या वृक्षांच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवण्यासाठी केवळ हा दाब पुरेसा नसतो.

त्यानंतर निसर्गाची दुसरी कमाल खोडाच्या अंतर्गत रचनेत पाहायला मिळते. झाडाच्या खोडामध्ये पाणी वाहून नेण्यासाठी अतिशय बारीक सूक्ष्म नलिकांचे एक मोठे जाळे अंथरलेले असते. या नलिका एवढ्या बारीक असतात की त्यांच्या भिंती आणि पाण्याचे अणू यांच्यात एक नैसर्गिक आकर्षण निर्माण होते. या आकर्षणामुळे पाणी नलिकेच्या भिंतींना पकडून आपोआप थोडे थोडे वर सरकू लागते. परंतु, पाणी वर चढवण्यातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा वाटा झाडाच्या पानांचा असतो.

झाडाच्या पानांवर अत्यंत सूक्ष्म छिद्रे असतात. सूर्यप्रकाशाच्या उष्णतेमुळे आणि वाहणाऱ्या हवेमुळे या छिद्रांमधून पानांतील पाण्याचे सतत बाष्पीभवन होत राहते आणि ते वाफेच्या रूपात हवेत मिसळते. पानांमधून पाणी जसे हवेत उडून जाते, तशी पानांच्या पेशींमध्ये पाण्याची कमतरता भासू लागते आणि तेथे एक प्रकारचा रिकामा भाग किंवा प्रचंड ताण निर्माण होतो. हा ताण एका अतिशय शक्तिशाली शोषक बलासारखे काम करतो. जसे आपण नळीने पेय वर ओढतो, अगदी तशाच प्रकारे पानांमधील हा ताण खोडातील पाण्याला वरच्या बाजूला खेचू लागतो.

या संपूर्ण प्रक्रियेला खरी ताकद मिळते ती पाण्याच्या अणूंच्या विशेष गुणामुळे. पाण्याच्या अणूंचे एकमेकांशी अत्यंत घट्ट आणि अतूट आकर्षण असते. ते एकमेकांना घट्ट पकडून ठेवतात. त्यामुळे मुळांपासून ते अगदी सर्वोच्च पानापर्यंत पाण्याचा एक सलग, न तुटणारा आणि भक्कम धागा किंवा स्तंभ तयार होतो. बाष्पीभवनामुळे पानांवर जेव्हा पाण्याचा एक अणू हवेत उडून जातो, तेव्हा तो आपल्या पाठीमागच्या अणूला वर खेचतो आणि ही साखळी मुळांपर्यंत सलग चालू राहते. पाण्याचा हा सलग धागा आणि बाष्पीभवनामुळे निर्माण होणारी जोरदार ओढ यांच्या मिलाफामुळे पाणी गुरुत्वाकर्षणाच्या नियमाला छेद देत अगदी सहजपणे वर चढते.

अशा प्रकारे जमिनीतील मुळांचा दाब, सूक्ष्म नलिकांमधील नैसर्गिक आकर्षण, पाण्याचा न तुटणारा सलग धागा आणि पानांमधील बाष्पीभवना मुळे निर्माण होणारी प्रचंड ओढ या सर्वांच्या अद्भुत समन्वयातून हे पाण्याचे चक्र अविरत चालत राहते. निसर्गाची ही बिनपाण्याची आणि बिनविजेची अत्यंत कार्यक्षम यंत्रणा पाहून मानवी बुद्धिमत्ता थक्क होते. कोणतीही मोटर किंवा पंप नसताना, शांतपणे आणि निसर्गाचे संतुलन राखत पाणी झाडाच्या सर्वोच्च शेंड्यापर्यंत पोहोचवण्याची ही प्रक्रिया खरोखरच सृष्टीच्या सर्वोत्तम चमत्कारांपैकी एक आहे.

### पश्चात्तापाची फळे

एका शहरात समीर नावाचा एक तरुण व्यावसायिक राहत होता. तो अतिशय हुशार होता, पण त्याचा स्वभाव खूप उतावीळ आणि धीर नसणारा होता. कोणत्याही गोष्टीची पूर्ण शहानिशा न करता घाईत निर्णय घेण्याची त्याची सवय होती.

एके दिवशी समीरने एका मोठ्या प्रकल्पासाठी नवीन सॉफ्टवेअर कंपनीशी करार केला. काही दिवसांतच त्याला बातमी मिळाली की, कंपनीच्या मालकावर बाजारात पैशांच्या अफरातफरीचा आरोप झाला आहे. समीरने कसलाही विचार न करता किंवा अधिकृत माहिती न घेता तात्काळ तो लाखो रुपयांचा करार रद्द केला आणि त्या कंपनीची सोशल मीडियावर जोरदार बदनामी केली.

दोनच दिवसांत खरी माहिती समोर आली. तो आरोप पूर्णपणे चुकीचा होता आणि प्रतिस्पर्धी कंपनीने कट रचून त्या मालकाला अडकवण्याचा प्रयत्न केला होता. पोलीस तपासात तो मालक पूर्णपणे निष्पाप सिद्ध झाला.

समीरने घाईघाईत घेतलेल्या निर्णयामुळे त्या कंपनीने समीरच्या कंपनीवर मानहानीचा खटला भरला आणि मोठा दंड ठोठावला. इतकेच नाही, तर बाजारात समीरची विश्वासार्हता पूर्णपणे संपली आणि त्याला व्यवसाय कायमचा बंद करावा लागला. थोडासा संयम ठेवून सत्य परिस्थिती जाणून घेतली असती, तर समीरचे एवढे मोठे नुकसान झाले नसते.

तात्पर्य : घाईत आणि भावनांच्या भरात घेतलेले निर्णय विनाश घडवून आणतात. यशासाठी हुशारीपेक्षा संयम आणि योग्य वेळी घेतलेला विचारपूर्वक निर्णय अधिक महत्त्वाचा असतो.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

वेगवेगळ्या धर्मात ज्योति आणि श्रुती चे संदर्भ : वेगवेगळ्या धर्मात ज्योति आणि श्रुतीच्या वर्णनात आश्चर्यकारक समानता दिसून येते. सृष्टीची निर्मिती परमेश्वरापासून झाली व त्या शक्तीनेच सर्वांना जीवन प्रदान केले आहे. ह्या शक्तिला वेगवेगळ्या नावांनी संबोधित गेले आहे. परंतु त्या सर्वांतर्गत समान गुण आहेत. उदा. बायबलमध्ये ह्यास 'शब्द' असे म्हटले गेले आहे.सुरुवातीला शब्द होता व हा शब्द परमेश्वराबरोबर होता; आणि हा शब्दच परमेश्वर होता. सारे काही त्याच्यापासूनच निर्माण झाले व जे असे काही निर्माण झाले त्यात एकही वस्तू अशी नाही की जी त्याच्याशिवाय निर्माण झाली. (यूहन्ना १:१-३)प्राचीन काळच्या ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी त्यास 'लोगोस' असे नांव दिले आहे.

त्यांच्या म्हणण्याप्रमाणे 'लोगोस' असे माध्यम आहे ज्याद्वारे परमेश्वराने सृष्टी केली आहे.जुन्या बायबलमध्ये लिहिलेले आहे, जेव्हा त्याने म्हटले, तेव्हा हे निर्माण झाले. (भजन संहिता: ३३:९)सर्व वस्तूंना तो (परमेश्वर) आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने सांभाळतो ! नविन नियम, इब्रानियो १:३)'गवत तर सुकेल आणि फूल कोमेजून जाईल. पण आमच्या परमेश्वराचा शब्द सदैव अटळ राहील.' (यशायाह ४०:८) तेव्हा परमेश्वराने म्हटले, प्रकाशित हो! लगेच प्रकाशमान झाले (उत्पत्ति १:३)हिंदु धर्मात 'शब्द'ला 'नाद' अथवा 'आकाशवाणी' उद्गीत, ज्योति आणि श्रुति किंवा 'प्रकाश' असे म्हटले गेले आहे. त्याचे संदर्भ वेद आणि उपनिषदांत आले आहेत.'नादा'चे सहाय्य घेतले, जो मधुरध्वनी आहे. इस्लाम मध्ये 'सूफी' लोक ज्योति आणि श्रुतीच्या धारेला, शब्दाला 'सुल्तान-उल-अजकार' (प्रार्थनेचा राजा), सौत-ए-सरमदी (दिव्य संगीत), 'निदा-ए-आसमाँ' (आकाशाचा आवाज), कलाम-ए-कदीम (प्राचीन ध्वनी) किंवा कलमा असे म्हणतात. (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय :

एक खूप प्रसिद्ध बोधकथा आहे. एकदा एक वडील आणि मुलगा गाढवावरून प्रवास करत असतात. त्यांना बघून रस्त्यावरचे लोक म्हणतात, किती लाजिरवाणी गोष्ट आहे की तरुण मुलगा गाढवावर बसला आहे आणि वयस्क वडील चालत प्रवास करत आहेत. हे ऐकून ते आपले स्थान-च्या जागा बदलतात. थोड्या वेळानंतर, काही जण म्हणतात, वडील स्वतः आरामात गाढवावर बसले आहेत आणि लहान मुलगा पायी चालतो आहे. किती क्रूर आहे हे. मग हे ऐकून वडील आणि मुलगा दोघेही त्या गाढवावर बसतात. पण तरीही लोक त्यांच्या वागण्यात चुका काढत म्हणतात, त्या गरीब बिचाऱ्या प्राण्यावर किती ओझं टाकत आहेत!

शिवानीदीदी :

आपण सगळ्यांनी ही गोष्ट वाचली आहे आणि हसलोही आहोत. वडील, मुलगा आणि गाढव यांच्यात शक्य ते सगळे पर्याय अवलंबूनही प्रत्येक वेळी चूक काढणारं कोणी ना कोणीतरी होतंच, हा या गोष्टीतला सर्वात महत्त्वाचा संदेश आहे. याचा अर्थ, गोष्टीतल्या पात्रांनी इतरांच्या बोलण्याकडे लक्ष देण्यापेक्षा स्वतःच्या सोयीप्रमाणे वागायला हवं होतं. हे आपल्या आयुष्यातही लागू पडतं. प्रत्येक जण स्वतःच्या संस्कारांप्रमाणे मत मांडणार त्यामुळे त्यांच्या संस्कारांप्रमाणे ते मत योग्य आहे. आता तुम्ही दिलेलं उदाहरण घेऊ या. जर तुम्ही तुमच्याकडची एखादी मोठी, महागडी गाडी घरात ठेवून छोट्या गाडीतून प्रवास केला.

तर ते पाहून एखादी व्यक्ती कपाळाला आठ्या पाडून म्हणेल, एवढं प्रसिद्ध कुटुंब पण एवढ्या छोट्या गाडीतून प्रवास करतंय. - त्याच वेळी कोणीतरी तुमची साधेपणाची प्रशंसा करेल. ते दोघेही त्यांच्या त्यांच्या संस्कारांप्रमाणे त्यांची मतं मांडत आहेत हे लक्षात ठेवा.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : चिंटू, सांग बघू, विजेच्या खांबावरून तार खाली का लटकलेली असते?

चिंटू : सर, खूप सोपं आहे... जेणेकरून विजेला चालू-चालू थकवा आला, तर ती थोडा वेळ त्यावर बसून विश्रांती घेऊ शकेल!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* रशियन क्रांती कोणत्या वर्षी झाली?

– १९१७

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

तुझ्या येण्याने माझी प्रतिष्ठा वाढेल, तू आमचे सर्वस्व आहेस विधाता तुझे रक्षण करो.हे ब्रह्मदेवा, बृहस्पति, विष्णू, सोम, सूर्य, अश्विनकुमार, वरुणदेवता, भगमित्रादेवता मी तुम्हा सर्वांना विनंती करतो की, आपण मला शूर, उत्तम, सुसंस्कारित व आरोग्यपूर्ण संतती द्यावी. अशा प्रकारे मंत्र म्हटल्यानंतर समागम करावा. यातून उत्कृष्ट अशी गर्भधारणा होते. हा गर्भाधान विधी १० व्या दिवसापासून १८ व्या दिवसापर्यंत करावा.

या विधीमुळे जन्माला येणारे बाळ इतर बाळांपेक्षा निश्चितच उत्कृष्ट, सुसंस्कारित, तेजस्वी असते.आयुर्वेदिक गर्भसंस्कारउजव्या पानावरील मजकूर -आयुर्वेदीय सोळा संस्कार८ षोडश संस्कार (सोळा संस्कार)भारतीय संस्कृतीमध्ये उगम पावलेल्या आयुर्वेदशास्त्रात षोडश संस्कार सांगितलेले आहेत.षोडश म्हणजे सोळा संस्कार! यांचा जीवन जगत असताना वेळोवेळी उपयोग होतो. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत बाल्यावस्था, तारुण्यावस्था व वार्धक्यावस्था या अवस्थांमध्ये वेळोवेळी हे संस्कार केले जातात. संस्कार म्हणजे वारंवार एखादी गोष्ट करीत राहणे. संस्कार केल्यामुळे आपल्या गुणांमध्ये योग्य ते परिवर्तन आपण घडवू शकतो; त्यामुळे हे षोडश संस्कार योग्यवेळी केल्याने मनुष्याची शारीरिक, मानसिक, बौद्धिक घडण उत्तम पद्धतीने होऊ शकते.

१) गर्भाधान संस्कार : मासिक पाळीच्या १० व्या दिवसापासून ते १८ व्या दिवसापर्यंत गर्भाधान विधी करतात.

शुभदिनी सायंकाळी भावी मातापित्याने स्नान करून, कुलदेवतेचे स्मरण करून, अपत्यप्राप्तीची इच्छा मनात धरून रात्री समागम करावा. यालाच गर्भाधान संस्कार असे म्हणतात. या संस्कारामुळे बालक हे उत्तम, तेजस्वी, बुद्धिमान व सुसंस्कारित होते. या विधीबद्दलची शास्त्रोक्त संपूर्ण माहिती आपण मागील प्रकरणात पाहिली आहे.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

# पदवीसोबत सॉफ्ट स्किल्सच नोकरीचे दार उघडतील

## प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांचे प्रतिपादन; कॅसासमध्ये महिंद्रा प्राइड क्लासरूमच्या ४० तासांच्या प्रशिक्षणाला प्रारंभ; अंतिम वर्षाच्या १५० विद्यार्थिनींचा सहभाग



न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) मधील सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड स्टडीज इन अप्लाइड सायन्सेस (कॅसास) येथे आयोजित सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे.

नगर – आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पदवी आणि गुण पुरेसे नाहीत. संवादकौशल्य, आत्मविश्वास, संघभावना आणि सादरीकरणाची कला ही सॉफ्ट स्किल्सच विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून देतात आणि कारकिर्दीत पुढे नेतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) मधील सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड स्टडीज इन अप्लाइड सायन्सेस (कॅसास) येथे महिंद्रा प्राइड क्लासरूम व नांदी फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने आयोजित ४० तासांच्या सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्राचार्य डॉ. सागडे म्हणाले, उद्योगक्षेत्रातील कंपन्या मुलाखतीत तांत्रिक ज्ञानाइतकेच उमेदवाराचे बोलणे, विचार मांडण्याची पद्धत, वेळेचे नियोजन आणि समस्या सोडवण्याची क्षमता तपासतात. स्वतःची ओळख प्रभावीपणे करून देणे, गटचर्चेत सहभाग, व्यावसायिक ई–मेल लेखन आणि कार्यालयीन शिष्टाचार ही कौशल्ये आत्मसात केल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थिनीही कोणत्याही कंपनीत आत्मविश्वासाने उभ्या राहू शकतात. महिंद्रा उद्योगसमूहाने विद्यार्थिनींसाठी दिलेली ही संधी पूर्ण मनाने स्वीकारा आणि प्रत्येक सत्राचा लाभ घ्या.

प्राचार्य डॉ. सागडे पुढे म्हणाले, सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड स्टडीज इन अप्लाइड सायन्सेस हे केंद्र केवळ वर्गात विषय शिकवण्यापुरते मर्यादित नसून येथे प्रवेश घेतलेल्या विविध अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. विभागप्रमुख प्रा. अरुण गांगर्डे व त्यांचे सर्व सहकारी शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासोबतच कॅसासमधील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी अविरत झटत आहेत. बी.एस्सी. क्लाउड कॉम्प्युटिंग, बी.एस्सी. डेटा सायन्स या अभ्यासक्रमांचा नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम आणि कॅसासच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केलेला कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) आशय यांची दखल घेऊन नुकतेच जयपूर येथील राष्ट्रीय परिषदेत कॅसासला 'इमर्जिंग टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट अवॉर्ड' प्रदान करण्यात आला, ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.

महिंद्रा अँण्ड महिंद्रा कंपनीच्या सामाजिक दायित्व (सीएसआर) निधीतून महिंद्रा प्राइड क्लासरूम उपक्रमांतर्गत नांदी फाउंडेशन, मुंबई हे प्रशिक्षण राबवत आहे. हा निधी केवळ विद्यार्थिनींच्या प्रशिक्षणासाठी दिला जातो आणि अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थिनीच त्यासाठी पात्र असतात, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. त्यानुसार कॅसासमधील पाच अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या एकूण १५० विद्यार्थिनी यात सहभागी झाल्या आहेत. मागील वर्षीही महिंद्रा कंपनीच्या सीएसआर निधीतून हेच प्रशिक्षण कॅसासमध्ये यशस्वीपणे राबवण्यात आले होते.

२६ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या या ४० तासांच्या प्रशिक्षणासाठी उद्योगक्षेत्रातील अनुभव असलेले कॉर्पोरेट प्रशिक्षक सौ. रुचिका मदने, तुषार इंगळे आणि मनोज भाटे मार्गदर्शन करत आहेत. उद्घाटनानंतर लगेचच प्रशिक्षणाच्या पहिल्या सत्रास सुरुवात झाली. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थिनींना महिंद्रा प्राइड क्लासरूम व नांदी फाउंडेशन, मुंबई यांचे संयुक्त प्रमाणपत्र दिले जाणार असून उद्योगक्षेत्रात या प्रमाणपत्राला विशेष महत्त्व आहे.

कॅसासमधील विद्यार्थिनी संगणकशास्त्र, डेटा सायन्स, क्लाउड कॉम्प्युटिंग, बीसीए अशा माहिती तंत्रज्ञानाशी निगडित अभ्यासक्रमांत शिकत असल्याने प्रशिक्षणाचा आशय आयटी उद्योगाच्या गरजेनुसार असावा, असा प्रस्ताव कॅसासने नांदी फाउंडेशनकडे दिला होता. त्यानुसार प्रशिक्षणात आयटी करिअरचा नकाशा, प्रकल्पाधारित तांत्रिक बायोडाटा, लिंक्डइन व गिटहब प्रोफाइल, ऑनलाइन अभियोग्यता चाचणीची तयारी, तांत्रिक व एचआर मुलाखतीतील संवाद, गटचर्चा, व्यावसायिक ई–मेल व लेखी संवाद, अजाईल कार्यपद्धती, आयटी क्षेत्रातील नीतिमूल्ये व डेटा सुरक्षा, ऑफर लेटर समजून घेणे व आर्थिक नियोजन अशा विषयांचा समावेश आहे. प्रशिक्षणापूर्वी व नंतर विद्यार्थिनींचे मूल्यमापन केले जाणार आहे.

कॅसासचे प्रमुख प्रा. अरुण गांगर्डे यांनी स्वागत करून प्रशिक्षकांचा परिचय करून दिला आणि प्रशिक्षणाची रूपरेषा सविस्तर मांडली. प्रा. प्रियंवदा पाटील यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमास कॅसासमधील प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# प्रेरणादायी अक्षरधन

## एकाग्रता साधल्यावर यश निश्चित

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स




चित्त एकाग्र करता आले. तर जगात असाध्य असे काही नाही. कोणत्याही कामात यश तुमच्यापुढे हात जोडून उभेच इतरांना अशक्य वाटणारे काम तुम्ही सहज करून जाल आणि लोक आश्चर्याने पाहतील तुमच्याकडे.

तुकाराम महाराज म्हणतात.

दुडीवरी दुडी चाले मोकळी गुजरी। ध्यान लागो ऐसे हरी ।।

पाण्याचे घडे एकावर एक रचून त्यांची उतरंड डोक्यावर घेणारी गुर्जर स्त्री कशी भराभर चालते वाटेन. वाटते, जादू तर नव्हे ही? तिने चित्त एकाग्र केलेले असते. तिचे ध्यान सदैव असते त्या उतरंडीकडेच. ताल आणि ताल सांभाळण्यात ती एकाग्रता कामी येते. सगळ्याच जटिल कामांवर मात करता येते ती मनाच्या या एकाग्रतेमुळेच. ऋग्वेददेखील हेच सांगते.

संदक्षेण मनसा जायते कवि ।

कर्तव्यात यशस्वी होण्यास कठिणातील कठीण समस्या सोडविण्याचे शहाणपण (कवि) येण्यास मनाची दक्षता. एकाग्रता हवी. ती होणे कठीण असते. कारण मन अत्यंत चपळ असते. तुकोबा सांगतात.

मन माझे चपळ, न राहे निश्चळ ।
घडी एकी पळ स्थिर नाही ।।

समर्थ रामदास स्वामीदेखील हेच सांगतात.

अचपळ मन माझे नावरे आवरिता ।

मन सैरावैरा धावत सुटते विषयोपभोगांकडे. क्षणभरदेखील ते जागेवर स्थिर राहत नाही. त्याला आवरणे भल्याभल्यांना जमत नाही.

गाय पळू नये म्हणून खुंट्याला बांधावी. पण ती खुंटा मोडून केव्हाच पळावी आणि मग तिच्यासाठी मालकाची पळापळा सुरू व्हावी. तसे मनाचे होते. मन आवरायला धावपळ करावी लागते. वाटते गाय बांधली आहे. पण तिच्यासाठी माणूसच बांधलेला असतो. तिच्यामागे धावतो. तसेच मन माझ्या ताब्यात आहे असे वाटते. पण ते केव्हाच दूर पळालेले असते आणि माणूस त्याच्या ताब्यात गेलेला असतो.

मग जिवाची तगमग होते. विषयोपभोगात अडकलेले मन माणसाला अस्वस्थ करते. मन अस्थिर नव्हे, माणूसच अस्थिर होतो. दीर्घायुष्य हवे, तर मन स्थिर करावे. ऋग्वेदात ऋषी हेच मागतो.

जीवातवे प्रतर साधया धियो ने।

हे अग्ने, सुखाने जगण्यासाठी मन आणि बुद्धी स्थिर राहो.

मग समुद्राप्रमाणे हवे. अमृतमंथनाच्या वेळी देवदेखील समुद्राकडे आश्चर्याने पाहू लागले. समुद्राच्या उदरातून अमृत निघाले, तसे विषदेखील. अमृत आणि विष हे दोन्ही पचविणारा समुद्र केवढा पवित्र आणि थोर. माणसाचे मन असेच असावे. आनंद आणि दुःख हे दोन्ही पचविणारे त्यासाठी हवी चित्ताची एकाग्रता. मनाला खेचून एके ठिकाणी स्थित करण्याची अंगी पात्रता ही यावी हेच वेदांचे आणि संतांचे मागणे आहे.

– किशोर गांधी

# समाजाच्या उद्धारासाठी झालेल्या कामांमुळे 'बडीसाजन'चे नावलौकिक संपूर्ण भारतात उंचवत आहे

## अध्यक्ष पेमराज बोथरा यांचे प्रतिपादन; ओसवाल श्रीसंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात




श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना अध्यक्ष पेमराज बोथरा. समवेत उपाध्यक्ष अजित कर्नावट, सचिव विशाल शेटिया, खजिनदार मिलिंद जांगडा, सहसचिव अनिल लुंकड आदींसह संचालक उपस्थित होते.

नगर – श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघाची धुरा २०२२ पासून हाती घेतल्यावर समाजाने आम्हला पाठबळ देत जेष्ठांनी भरभरून दिलेल्या आशीर्वादामुळेच संस्था प्रगतीच्या शिखरावर जात आहे. समाजाच्या प्रतिसादामुळे व सहकार्यानेच जास्तीतजास्त समाजाभिमुख कामे करण्याची ताकद मिळाली आहे. केडगाव येथे उभारण्यात आलेल्या 'पारस नवजीवन घरकुल योजनाच्या इमारतीचे लोकार्पण व गरुजू कुटुंबांना मोफत घरकुले देऊन संस्थेने वचनपूर्ती केल्याचे मोठे समाधान वाटत आहे. समजाच्या उद्धारासाठी झालेल्या कामांमुळे नगरच्या बडीसाजन संस्थेचे नावलौकिक संपूर्ण भारतात उंचावले आहे. बडीसाजन समाजाच्या एकजुटीमुळेच हे शक्य होत आहे, असे प्रतिपादन बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा यांनी केले.

श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष पेमराज बोथरा यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी विषय पत्रीकेवरील सर्व विषय एकमताने मंजूर झाले. सभेस संस्थेचे उपाध्यक्ष अजित कर्नावट, सचिव विशाल शेटिया, सहसचिव अनिल लुंकड, खजिनदार मिलिंद जांगडा, सहखजिनदार दीपक बोथरा आदींसह सर्व संचालक व सभासद नागरिक उपस्थित होते. यावेळी झालेल्या साधकबाधक चर्चेतून अनेक सभासदांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

पेमराज बोथरा पुढे म्हणाले, बडीसाजन श्रीसंघाने लोकसहभागातून उभारलेल्या सॉलीटीयर या अद्ययावत भव्य व आकर्षक वास्तूची देशभर चर्चा आहे. बडीसाजन समाजातील दुर्बल घटकांच्या मदतीसाठी व उद्धारासाठी सुवर्ण कमल योजनेमध्ये भरघोस वाढ केली आहे. तसेच गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सहकार्य करत आहोत. भविष्यात याहून अधिक चांगली कामे, योजना व उपक्रमांनी समजाच्या उद्धारासाठी योगदान देणार आहोत. संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालकांचे मौलिक योगदान मिळत असून युवक संघाचेही काम कौतुकास्पद आहे.

वार्षिक सभेचे प्रास्ताविक संचालक नरेंद्र बाफना यांनी केले.

सचीव विशाल शेटिया यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देत कार्याचा आढावा घेत सूत्रसंचालन केले.

खजिनदार मिलिंद जांगडा यांनी इतिवृत्त व वार्षिक ताळेबंद मांडला.

उपाध्यक्ष अजित कर्नावट यांनी आभार मानले.

या सभेस बडीसाजन ओसवाल श्रीसंघाचे संचालक सुमतिलाल कोठारी, धरमचंद कोठरी, राजेंद्र बोथरा, पोपटलाल कटारिया, नरेंद्र चोरडिया, राजेंद्र ताथेड, पोपट लोढा, मनोज शेटिया, दीपक बोथरा, दिनेश शिंगवी, अनिल दुगड, सुशील भंडारी, धन्यकुमार बरमेचा, सिए मोहन बरमेचा, प्रफुल्ल चोरडिया, कचरदास लुंकड, सिए किरण भंडारी आदींसह सभासद उपस्थित होते.

# सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेत १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ

## सभासदांचा विश्वास आणि सहकार्यातून पतसंस्थेची प्रगती : अभय पितळे



सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेत १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ करताना चेअरमन अभय पितळे.

नगर – सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेने सभासदांना १५ टक्के लाभांश वाटपाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षीच्या लाभांश वाटपाचा शुभारंभ चेअरमन अभय पितळे यांच्या हस्ते झाला. पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात हा कार्यक्रम झाला.

याप्रसंगी व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, समीर बोरा, विनित बोरा, शरद गोयल, श्रीकांत भागवत, अमित भांड, तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, सतीश गुंदेचा, सचिन डागा, जनता बचत प्रतिनिधी कांतीलाल गांधी, अभय बोरा, मिलिंद परिहार, प्रफुल्ल छेडा, वैभव मुनोत, कुमार नारंग, किरण बोरा आदी उपस्थित होते.

चेअरमन अभय पितळे म्हणाले, सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा यांच्या आदर्शांवर पतसंस्थेचे कामकाज सुरू आहे. रौप्य महोत्सवी टप्पा ओलांडताना पतसंस्थेने स्थापनेपासून कायम १५ टक्के लाभांश दिला आहे, याचा अभिमान वाटतो. आजमितीस संस्थेकडे १०४ कोटींच्या ठेवी आहेत. संस्था सर्वांत कमी व्याजदराने म्हणजे फक्त ९ टक्के दराने सोनेतारण कर्ज उपलब्ध करुन देते. सभासदांचा विश्वास आणि शिस्तबद्ध कारभारामुळे संस्थेने नेहमीच प्रगती केली आहे. सर्वांना सोबत घेऊन कारभार सुरू असल्याने संस्था यशस्वी घोडदौड करत आहे.

जनता बचत प्रतिनिधी कांतीलाल गांधी म्हणाले, सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा यांनी पतसंस्था स्थापन करताना बचत प्रतिनिधींना खूप प्रोत्साहन व पाठबळ दिले. संस्थेकडून कायम बचत प्रतिनिधींची काळजी घेतली जाते. संस्थेच्या विश्वासार्हतेमुळे बचत प्रतिनिधींना चांगल्या वातावरणात काम केल्याचा आनंद मिळतो. य संस्थेशी जोडलेलो असल्याचा अभिमान वाटतो.

आभार मानताना व्हाईस चेअरमन शैलेश गांधी म्हणाले, ज्या सभासदांचे पतसंस्थेत सेव्हिंग्ज खाते नाही त्यांनी सेव्हिंग्ज खाते उघडून घ्यावे. त्यामुळे खातेदार व सभासदांची केवायसी प्रक्रिया पूर्ण होईल तसेच लाभांशही या खात्यावर जमा होईल. लाभांश बुडण्याची भीती राहणार नाही. संस्थेच्या आर्थिक प्रगतीत बचत प्रतिनिधींचाही मोठा वाटा आहे. सर्व प्रतिनिधी खूप प्रामाणिकपणे आपले काम करत असतात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत भंडारी यांनी केले.



## मराठा मंदिर सिनेमाचा "Winners Book of World Records' तर्फे गौरव

'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या चित्रपटाच्या ऐतिहासिक प्रवासाबद्दल मुंबईतील मराठा मंदिर सिनेमाचा "Winners Book of World Records' तर्फे गौरव करण्यात आला. २० ऑक्टोबर १९९५ रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने २० ऑक्टोबर २०२६ रोजी ३१ वर्षे पूर्ण केली. मराठा मंदिर सिनेमात या चित्रपटाने १२ डिसेंबर २०१४ रोजी १,००० आठवड्यांचा ऐतिहासिक टप्पा गाठला होता. या गौरवाचे प्रमाणपत्र चेअरपर्सन मिस इंडिया डॉ. ईशा अग्रवाल आणि अध्यक्ष डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते सिनेमाचे मालक मनोज देसाई यांना प्रदान करण्यात आले.



फटाका व्यापारी असोसिएशनच्या वतीने उभारलेल्या मार्केटचा शुभारंभ करताना आमदार संग्राम जगताप.

# कल्याण रोडवरील घाऊक फटाका मार्केटचा शुभारंभ

नगर – दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर कल्याण रोड येथे अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या वतीने उभारण्यात आलेल्या घाऊक फटाका मार्केटचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. ग्राहकांच्या सोयीसाठी विविध प्रकारचे फटाके, आवश्यक सुविधा आणि उत्तम पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यावेळी आ. जगताप म्हणाले की, दिवाळी हा आनंद, उत्साह आणि मांगल्याचा सण असून, या सणानिमित्त नागरिकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळतो. दिवाळीच्या काळात घरे, दुकाने आणि परिसर रोषणाईने उजळून निघतात. कुटुंबीय, मित्रपरिवार आणि आप्तस्वकीयांसोबत आनंद साजरा करताना फटाक्यांनाही विशेष महत्त्व असते. नागरिकांचा हाच आनंद द्विगुणित करण्यासाठी अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या वतीने कल्याण रोडवर अधिकृत फटाका मार्केट उभारण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या मार्केटचे नियोजन करण्यात आले असून, नागरिकांना विविध प्रकारचे फटाके एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. ग्राहकांना चांगल्या दर्जाचे फटाके मिळावेत आणि त्यांची खरेदी अधिक सुलभ व्हावी, या दृष्टीने व्यापारी असोसिएशनने केलेला हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे.

अध्यक्ष गजेंद्र राशिनकर यांनी प्रास्ताविकात मार्केट उभारण्यामागील भूमिका स्पष्ट केली.

असोसिएशनचे सचिव सुरेश जाधव यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. उपाध्यक्ष मयूर भापकर, संजय जंजाळे, सचिव सुरेश जाधव, सहसचिव अमोल तोडकर, खजिनदार गणेश शिरसागर, कार्याध्यक्ष डी. एम. ढवळे, श्रीनिवास बोज्जा, गणेश परभाने, विकास पटवेकर, संभाजी कराळे, शिरीष चंगेडे, सोमनाथ रोकडे, अशोक कर्डीले, छबुराव जाधव, सुनील पोपटानी, प्रकाश मुथा, अरविंद काळे, निखिल परभाने, अनिल टकले, राम मुलतानी, संतोष तोडकर, ओम दारकुंडे, सोमनाथ देवकर, सतीश दारकुंडे, विजय मुनोत, विजय मुनोत, अरविंद साठे, सुनील गांधी यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी, व्यापारी आणि नागरिक उपस्थित होते. संजय जंजाळे यांनी आभार मानले.

# चांदण्यांच्या साक्षीने फुलला 'स्कायब्रिज परिवार'चा स्नेहसोहळा

## कोजागिरी पौर्णिमेनिमित्त सुरेल मैफल आणि सामूहिक दुग्धपान



नगर – शरदाच्या टिपूर चांदण्यात रंगलेली सुरेल गाण्यांची मैफल, भक्तिगीतांनी भारावलेले वातावरण, गप्पागोष्टींमधून खुलणारे स्नेहबंध आणि आबालवृद्धांचा सहभाग अशा आनंदमय वातावरणात बुरूडगाव रोडवरील स्कायब्रिज येथे कोजागिरी पौर्णिमेचा उत्सव साजरा करण्यात आला. दैनंदिन व्यग्रतेतून वेळ काढत रहिवासी कुटुंबे एकत्र आली आणि या स्नेहसोहळ्यातून 'स्कायब्रिज परिवार'च्या आपुलकीचे दर्शन घडले. अध्यक्ष अमृतलाल कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली सोसायटीच्या कार्यकारिणीने या कार्यक्रमाचे नियोजन केले. सर्व वयोगटांतील सदस्यांना सहभागी होता येईल, प्रत्येक कुटुंबाला एकत्रित आनंद घेता येईल आणि शेजारधर्माचे नाते अधिक दृढ होईल, याचा विचार करून समितीने घेतलेल्या परिश्रमांमुळे कार्यक्रमाला कौटुंबिक सोहळ्याचे स्वरूप प्राप्त झाले. धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांच्या आयोजनातून प्रत्येक कुटुंबाला सोसायटीच्या सामूहिक जीवनात सहभागी करून घेण्याचा समितीचा प्रयत्न या उत्सवातही दिसून आला.

कार्यक्रमाची पूर्वतयारी, सदस्यांशी समन्वय आणि प्रत्यक्ष आयोजनासाठी कार्यकारिणी व रहिवासी सदस्यांनी दिलेल्या योगदानामुळे सोहळा उत्साहात पार पडला. अध्यक्षांसह संपूर्ण समितीची कार्यतत्परता आणि त्याला मिळणारी रहिवाशांची साथ ही स्कायब्रिजच्या उपक्रमांची विशेष ताकद ठरत आहे.

कराओकेच्या सुरांनी रंगली चांदण्यांतील मैफल : कराओके संगीताच्या साथीने रहिवाशांनी सादर केलेल्या सुरेल गीतांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. भक्तिगीतांनी वातावरण भक्तिमय झाले, तर गाण्यांच्या सादरीकरणांना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी या मैफलीचा मनमुराद आनंद घेतला.

चंद्राच्या शीतल प्रकाशात सामूहिक दुग्धपान करत रहिवाशांनी एकमेकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. विचारांची देवाणघेवाण, जुन्या आठवणींना उजाळा आणि नव्याने दृढ होणारी मैत्री यामुळे हा सोहळा अधिक संस्मरणीय ठरला.

या कार्यक्रमाला सिद्धार्थ लोढा, ऋषभ बलदोटा, रोहन गांधी, सौरभ झंवर, योगेश मंत्री, अमित लोढा, प्रितम गुंदेचा, निनाद भळगट, श्रेणिक गुगळे, जिनाम गुगळे आदींसह सोसायटीतील कुटुंबांचा सहभाग लाभला.



**शहर सहकारी बँकेच्या माजी कर्मचाऱ्यांचा स्नेह मेळावा...** अहिल्यानगर येथील प्रसिध्द शहर सहकारी बँकेच्या स्थापनेपासून बँकेत असलेले कर्मचारी वयानुसार निवृत्त झालेले सर्व कर्मचाऱ्यांचा २४ ऑक्टोर रोजी रोजी औरंगाबाद रोडवरील सिंड्रेला पार्क येथे स्नेह मेळावा झाला यामध्ये शहर बँकेचे माजी सीईओ तनवीर खान, बँकेचे सुरुवातीचे कर्मचारी अधिकारी विनायक ढाकेफळकर माजी कर्मचारी प्रतिनिधी राजु विद्ये, नंदकुमार राऊत, राजेंद्र मेहेर, मोरेश्वर मुळे, रणजित पोखर्णा, मच्छिंद्र फुलसौंदर, राजेंद्र चोरमारे, बाळु राऊत, पाडुंरंग जगताप, साळुंके, विजय होशींग, अनिल एखंडे, दासर, अशोक उपलंची, विकास साव, भरत चिंधे उपस्थित होते. या मेळाव्यात बँकेत काम करतांना झालेले मजेशीर किस्से खातेदारांना सेवा देतांना आलेल्या अडचणी वगैरे आठवण सांगुन हास्य विनोदासह सर्व कर्मचाऱ्यांनी स्नेह मेळावात आनंद लुटला दरवर्षी अशा प्रकारे मेळावा साजरा केला जातो.

# कोहिनूर वस्त्रदालनात यावर्षी ‘लक की नही हक की दिवाली’

**२८ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर दरम्यान प्रत्येक खरेदीवर हमखास आकर्षक गिफ्ट**



नगर – कोहिनूर वस्त्रदालनात ’लक की नही हक की दिवाली’ मध्ये १ हजार रूपयांच्या पुढील प्रत्येक खरेदीवर ग्राहकांना हमखास आकर्षक गिफ्ट दिले जाणार आहे. २८ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत सावेडी रोडवरील कोहिनूर मॉल वस्त्रदालन, नगर शहरातील एम.जी.रोड आणि नाशिक येथील कॉलेज रोडवरील दालनात ही दिवाळी गिफ्ट योजना असणार आहे. ग्राहकांना दिवाळी खरेदीचा दुहेरी आनंद या योजनेतून मिळाला असल्याचे अश्विन गांधी यांनी सांगितले.

श्वेता गांधी यांनी सांगितले की, ९१ वर्षांची विश्वास आणि गुणवत्तेची परंपरा असलेल्या कोहिनूर वस्त्रदालनाला ग्राहकांचा नेहमीच प्रतिसाद मिळाला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सर्वोत्तम कपड्यांसाठी कोहिनूर नावाजले जाते. दिवाळीची कपडे खरेदी संपूर्ण कुटुंबियांसाठी खूप आनंदाची असते. हा आनंद संस्मरणीय करणारी गिफ्ट योजना आणली आहे. यात तिन्ही दालनात ग्राहकांना एक हजारांपुढील प्रत्येक खरेदीवर आकर्षक गिफ्ट मिळणार आहे. ग्राहकांच्या सुविधेसाठी योजना कालावधीत दालन बुधवारीही खुले राहणार आहे. याशिवाय दिवाळीनिमित्त कॉर्पोरेट गिफ्ट व्हाउचर, कंपनी किंवा मोठ्या आस्थापनातील कर्मचाऱ्यांसाठी कॉर्पोरेट युनिफॉर्मही मिळतील.

वस्त्रदालनात बिस्पोक टेलरिंग सुविधाही उपलब्ध आहे. त्यामुळे ग्राहकांना मनपसंत आणि रूबाबदार फिटिंग असलेले कपडे शिवून मिळतील. कापड खरेदी करून ते येथेच शिऊन मिळणार आहे. यासह फॅशन विश्वातील प्रसिद्ध फॅशन डिझायनर सेवाही उपलब्ध आहे. विकास राठोड हे फॅशन आणि टेक्सटाईल क्षेत्रातील अग्रगण्य डिझायनर आहेत. बॉलिवूड सेलिब्रिटींसाठी ते फॅशन डिझायनर म्हणून काम करतात. मेन्स एथनिक वेअर, डिझायनर सूट आणि फ्युजन स्टाईल कपड्यांच्या डिझाइनमध्ये त्यांचा हातखंडा आहे. ते लग्न समारंभातील डिझायनर कलेक्शनसाठी स्टायलिंग आणि क्रिएटिव्ह काम करतात.

वस्त्रदालन दिवाळीच्या खास खरेदीसाठी कपड्यांची मोठी व्हरायटी घेऊन सज्ज झाले आहे. डिझायनर साड्या, पैठणी, सिल्क, आधुनिक फॅशन, प्रिंटेड साड्यांसह महिलांचे रेडिमेडस, सुटींग शर्टींग, रेडिमेडस, खास दिवाळीसाठी कुर्ता पायजमा, एथनिक वेअर्स उपलब्ध आहेत. लहान मुलांच्या कपड्यांसाठी तीनही दालनात स्वतंत्र व्यवस्था आहे. नामांकित ब्रॅण्डचे रेडिमेड, एथनिक वेअर्स, पार्टी वेअर्स या ठिकाणी उपलब्ध आहेत. त्यामुळे संपूर्ण परिवाराला एकाच छताखाली खरेदीचा पुरेपूर आनंद मिळणार आहे.

दिवाळीची खरेदी प्रत्येकासाठी खास असते. नवीन कपडे घेताना प्रत्येक जण चोखंदळ असतो. हाच कल ओळखून कोहिनूरने सातत्याने नवनवीन व्हरायटीची वस्त्र संपदा ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे. आगामी लग्नसराईचा बस्ता, वधूवरांसाठीचे खास पेहराव सुध्दा आताच खरेदी करता येतील.

लग्न बस्त्यासाठी दालनात स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. प्रशस्त पार्किंग सुविधा असल्याने निवांत वातावरणात खरेदीचा आनंद घेता येतो. ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेत दिवाळीची खरेदी करण्याचे आवाहन केले आहे.

# नगरमध्ये २९ व ३० ऑक्टोबरला ‘अमृतपेठ प्रदर्शना’चे आयोजन




नगर – राज्य शासनाच्या अमृत या संस्थेतर्फे ‘अमृतपेठ – थेट बाजारपेठ’ या विशेष प्रदर्शनाचे आयोजन २९ व ३० ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. शासनाच्या अमृत संस्था व चिरंजीव प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने खास दिवाळीनिमित्त होणारे हे प्रदर्शन सावेडीच्या हॉटेल व्हाईट हाऊस, कोहिनुर मॉल जवळ येथे सकाळी ९ ते रात्री ९पर्यंत सर्वांसाठी खुले असणार आहे. स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी अमृतपेठ हा विशेष उपक्रम राज्य शासन राबवत आहे. २९ ऑक्टोबरला होणाऱ्या प्रदर्शनास नागरिकांनी भेट देऊन स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन अमृत संस्थेचे अहिल्यानगर जिल्हा समन्वयक सागर भोपे यांनी केले.

या प्रदर्शनामध्ये स्थानिक लघु उद्योजकांचे स्टॉल्स असून त्यात महिला उद्योजकांना प्राधान्य देण्यात आले अहे. नागरिकांना येथे दिवाळीसाठी विविध प्रकारचे दर्जेदार स्वदेशी व घरगुती उत्पादने माफक दरात थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.

यामध्ये विविध खाद्यपदार्थ, दैनंदिन वापराच्या वस्तू, कपडे, आयुर्वेदिक उत्पादने, कॉस्मेटिक, ज्वेलरी व हस्तकलेच्या वस्तूंचा सम ावेश आहे. अधिक माहितीसाठी ९७६६६२२२७४ या मोबाईलवर संपर्क साधावा.



शेतकरी संघटनेची कार्यकारिणी जाहीर होऊन नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष बाबा महाराज झेंडे, उपाध्यक्ष नारायण रोडे, सचिव संजय तोडमल, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड पदाधिकारी, स्वयंसेवक आदी.

# अखिल महाराष्ट्र वारकरी शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदी बाबा महाराज झेंडे यांची निवड

नगर – अखिल महाराष्ट्र वारकरी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी व स्वयंसेवकाची एकत्रित बैठक नगरमध्ये झाली. या बैठकीला राज्यातून पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सर्वानुमते, एकमुखी निर्णयाने संघटनेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यात अखिल महाराष्ट्र वारकरी शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदी बाबा महाराज झेंडे, उपाध्यक्षपदी नारायण रोडे, सचिवपदी संजय तोडमल तर कार्याध्यक्षपदी ज्ञानेश्वर गायकवाड यांची निवड जाहीर करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ॲड. राजेंद्र वाबळे म्हणाले, शेतकरी आज उपासमारीने मरायला लागला आहे. त्याचे पशुधन मरणाच्या यातना सोसत आहे. तो वाचला तर जग वाचेल तेव्हा शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांचे हक्काचे अधिष्ठाण उभे राहण्यासाठी शेतकरी वारकरी संघटनेची स्थापना झाली आहे.

यावेळी जालिंदर जगताप, गोवर्धन काळे, पाराजी शिंदे, रोहिदास पंदरकर, भानुदास पवार, सुनील लोंढे, बबनराव साबळे, अनिल कानगुडे, महादेव पिंपळे, हभप गव्हाणे महाराज, नवनाथ आव्हाड, महेश वाघ, रोहिदास उदमले, भाऊसाहेब काळे, संतोष मोरे, मनोहर पाटील, प्रतिभाताई धस, वैष्णवीताई पवार, कविता खासेराव आदी स्वयंसेवक, पदाधिकारी उपस्थित होते.

बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड यांनी आभार मानले.

# भारुड, अभंग नृत्याविष्कार अन् संगीत नाटकाने संत साहित्य संमेलन गाजले

**कोजागिरी पौर्णिमेच्या पर्वात भक्तिरसात न्हालं सभागृह; नगरकरांचा प्रतिसाद**



संत साहित्य संमेलनात नगरकरांनी भारुड, संतांच्या अभंगांवर सादर झालेला कथ्थक नृत्याविष्कारन व ‘सखा पांडुरंग’ या नव्याकोऱ्या संगीत नाटकाचा आस्वाद घेतला.

नगर – अहिल्यानगरमध्ये प्रथमच आयोजित जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलन भारुड, अभंग नृत्याविष्कार अन् संगीत नाटकाने गाजले. राज्य शासनाच्या मराठी भाषा विभाग आणि साहित्य व संस्कृती मंडळाच्या आर्थिक सहयोगातून तसेच नगरच्या आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या दोनदिवसीय संमेलनात साहित्यिक कार्यक्रमांसोबतच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी नगरकर रसिकांना अनुभवायला मिळाली. कोजागिरी पौर्णिमेच्या पावन पर्वावर आयोजित या संमेलनाने नगरकर रसिकांना संत साहित्य, संगीत, नृत्य आणि अध्यात्माची अनोखी मेजवानी दिली.

संतांच्या विचारांचा जागर घडवणाऱ्या या संमेलनात भारुडाच्या माध्यमातून लोकप्रबोधनाचा प्रभावी आविष्कार सादर करण्यात आला. संतांच्या अभंगांवर आधारित कथ्थक नृत्याविष्काराने भक्ती आणि नृत्यकलेचा सुरेख संगम घडविला. अहिल्यानगर जिल्ह्यातील संतांच्या अभंगांचे सुमधुर गायन हे रसिकांसाठी विशेष भाग ठरला. त्याचबरोबर संमेलनाचे प्रमुख आकर्षण ‘सखा पांडुरंग’ या नव्या संगीत नाटकाच्या शुभारंभाच्या प्रयोगाने संमेलनाच्या वैभवात भर घातली. प्रत्येक सादरीकरणाला रसिकांकडून दाद मिळाली. संत साहित्य केवळ वाचनापुरते मर्यादित न राहता संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलेच्या माध्यमातून जनमानसापर्यंत पोहोचू शकते, याचा प्रत्यय या कार्यक्रमांतून आला.

संत साहित्य संमेलनात ज्ञान माऊली भजनी मंडळाच्या महिलांनी लोक मनोरंजनातून समाजप्रबोधन, अध्यात्म, भक्ती, नैतिकता आणि सामाजिक दोषांवर भाष्य करणारे विविध भारुड येथे सादर केले. महिलांनी विनोद, उपरोध संवादामधून रडगा वाहीन तुला..., बुरगुंडा होईल ग... हे गाजलेले भारुड सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी डॉ. उज्वला जाधव–भोर, प्रा. डॉ. वर्षा कीर्तने, ह.भ.प. रामनाथ मुतडक, ह.भ.प. राजेंद्र महाराज नवले, ह.भ.प. आदिनाथ फाटके हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. भारुडाचे निवेदन सुचित्रा भालेराव यांनी केले.

संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध संतांच्या अभंगांचे गायन ‘संत रंगी रंगले’ या कार्यक्रमात गायिका डॉ.धनश्री खरवंडीकर व साथीदारांनी सादर केले. यावेळी अगस्तीमुनींचा महिमा सांगणारे प्राचार्य अनिल सहस्त्रबुद्धे लिखित अगस्त्य अगस्त्य... या अभंगाच्या सादरीकरणात संपर्ण सभागृह तल्लीन झाले. यावेळी मकरंद खरवंडीकर, शेखर दरवडे यांनी संगीत साथ दिली.

स्त्रीशक्ती संतस्वरा नृत्याविष्कारातून विविध संतांच्या अभंग रचनांवर आधारित कथ्थक नृत्याविष्काराचे भक्तिपूर्ण सादरीकरण नृत्यांगनांनी केले. नृत्य दिग्दर्शक कल्याणी काम तकर यांच्यासह साथीदारांनी हा उत्कृष्ट नृत्याविष्कार सादर केला. यावेळी पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य माहेश्वरी गावित, डॉ. ना. ज. पाउलबुद्धे महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा डावरे, सौ. विमल जाधव, सौ. वीणा धनेश्वर, सौ. प्रणाली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पंढरपूरीच्या विठ्ठलाला पांडुरंग हे नाव कसे मिळाले? पांडुरंगाचे प्रथम प्राकटन कुठे आणि कसे झाले ? याचे रहस्य उलगडणारे दोन अंकी नवे कोरे संगीत नाटक ‘सखा पांडुरंग अर्थात गोविंदा गोविंदा पांडुरंगा विठ्ठला...’ या संगीत नाटकाचा शुभारंभाच्या विशेष प्रयोगाचे आयोजन संत साहित्य संमेलनात झाले. प्रा.डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे लिखित व श्रुती संगीत निकेतच्या डॉ.धनश्री खरवंडीकर दिग्दर्शित या नाटकाची निर्मिती नगरमध्येच झाली असून सर्व स्थानिक कलाकारांनी यात भूमिका साकारल्या आहेत. या नाटकाच्या उत्कृष्ट सदरीकरण, संगीत व अभिनयाला उपस्थित श्रोत्यांनी उभे राहून टाळ्या गजरात मानवंदना दिली. साहित्य संमेलनातील सर्व उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग सामूहिक चिंतन प्रकल्पाचे सर्व साधकांनी, संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

# सोशल मीडियावर बनावट खाते हा गंभीर गुन्हा

**सायबर सुरक्षा जनजागृती**



सागर ढिकले

नगर – फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सप, टेलिग्राम सारख्या सोशल मीडियावर बनावट खाते ओळखीच्या तरूण–तरूणींना त्रास देण्याच्या हेतूने उघडण्याचे अनेक प्रकार उघडकीस आले आहे. माहिती–तंत्रज्ञान कायद्यानुसार हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. सोशल मीडियावर खोट्या नावाने खाते उघडू नको, असे आवाहन सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले.

शहरातील बालिकाश्रम रस्त्यावरील कमल एज्युकेशन संस्थेमधील पोलिस, सैन्य दल, राज्य सेवा सरळ भरती प्रशिक्षण केंद्रामधील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांसाठी आयोजित सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमात पोलिस निरीक्षक ढिकले बोलत होते. संस्थेचे संचालक हर्षद वारे अध्यक्षस्थानी होते. हरियाली संस्थेचे अध्यक्ष अभय ललवानी, संचालक फुलचंद बारस्कर, पोलिस अंमलदार राघवेंद्र भालसिंग, नीलेश पठारे आदी उपस्थित होते.

पोलिस निरीक्षक ढिकले म्हणाले की, प्रेमसंबंध संपुष्टात येणे, दुसऱ्या व्यक्तीशी लग्न जमणे या सारख्या घटना घडलेल्या क्रियेला प्रतिक्रिया म्हणून सोशल मीडियावरील बनावट खात्यातून बदनामी करणे, जुने फोटो व्हायरल करण्यासारखे प्रकार घडले आहे. कोणत्याही व्यक्तीचे बदनामीकारक, चरित्र्यहनन होईल, असे फोटो, व्हिडिओ व्हायरल करणे माहिती–तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (सी) नुसार गंभीर गुन्हा आहे. या गुन्ह्याखाली दोषी आढळल्यानंतर शिक्षेसह दंडाची तरतूद आहे.

कोणत्याही गुन्ह्यामध्ये शिक्षा झाल्यास शासकीय सेवेसह करिअरचे दरवाजे बंद होतात. ईमेल आणि मोबाईलच्या आयएमई क्रमांकामुळे तत्काळ लागतो. तांत्रिक स्वरूपाचा हा गुन्हा असल्याने बचावाचा पर्याय नाही. त्यामुळे सोशल मीडियावर बनावट खाते उघडू नये.

सायबर गुन्हेगारांना भौगोलिक मर्यादा नाहीत. परदेशात राहून सायबर गुन्हे करत असल्याने त्यांचा शोध घेण्यात अडचणी येत आहेत. शेअर मार्केटच्या आमिषाने सोशल मीडियावरील अनोळखी व्यक्तीमार्फत गुंतवणूक करू नये, अनोळखी व्यक्तीला बँकेची माहिती देऊ नये. एपीके फाईल, क्वीक स्पोर्ट सारखे ॲप डाऊनलोड केल्यास माहितीमधील सर्व डाटा समोरील व्यक्तीला मिळतो. ऑनलाईन कर्ज देणारे मोबाईलमधील संपर्क क्रमांकावरील व्यक्तींना त्रास देऊन कितीतरी पटीने ज्यादा रक्कम आकारतात. सोशल मीडियावरील ऑफर, आमिषाला बळी पडून कोणतेही व्यवहार करू नका. सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने करणे आवश्यक आहे.

### गोल्डन अवर

सोशल मीडियाच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक झाल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधून माहिती देणे आवश्यक आहे. अशा घटनेमध्ये सायबर गुन्हेगार पैसे दुसऱ्या खात्यांमध्ये वेगाने तत्काळ हस्तांतरीत करतात. आर्थिक फसवणूक झाल्यास एका तासांच्या आतमध्ये पोलिसांशी संपर्क साधल्यास हस्तांतरीत रक्कम थांबविण्याला प्रतिबंध करता येतो. ही रक्कम परत मिळण्याची शक्यता जास्त राहते. अशा घटनांमध्ये प्रारंभीचा एक तास गोल्डन अवर ठरतो.



जिल्हा क्रिकेट स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविलेले माऊंट सिनायच्या विजेत्या खेळाडू.

# माऊंट सिनायच्या मुली जिल्हा क्रिकेट स्पर्धेत तृतीय

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व संगमनेर तालुका क्रीडा समिती यांच्या वतीने श्रीश्री रविशंकर विद्यालय, संगमनेर येथे आयोजित जिल्हा स्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेत अहिल्यानगर तालुक्याचे प्रतिनिधीत्व करीत सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या मुलींच्या संघाने दमदार कामगिरी केली आहे. १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या गटात माऊंट सिनायच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

कर्णधार साक्षी राठोड, शिफा शेख, निर्मयी झोडगे, अक्षदा उबाळे, श्रुष्टी पोकळे व रुतुजा म्हस्के यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. उत्कृष्ट खेळाच्या जोरावर कर्णधार साक्षी राठोड हिची अकलूज जि. सोलापूर येथे होणाऱ्या पुणे विभाग स्तरीय निवड चाचणी साठी अहिल्यानगर जिल्ह्यातून निवड झाली आहे.

या यशाबद्दल शाळेचे संस्थापक डॉ. शाम खरात, मुख्याध्यापिका सौ. जयश्री खरात, क्रीडा शिक्षक किशोर उबाळे व मुजाहिद शेख व शिक्षकांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.



वाडिया पार्क येथे शालेय मुलींच्या १४, १७ आणि १९ वर्षांखालील वयोगटातील विभागीय तलवारबाजी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते करण्यात आले. (छायाचित्र – अमित मन्यार)

# ‘तलवारबाजी’मध्ये मुलींनाही भविष्यात मोठ्या संधी : जिल्हा क्रीडाधिकारी खुरंगे

## वाडिया पार्क येथे शालेय मुलींच्या तलवारबाजी स्पर्धेचे उद्घाटन

नगर – तलवारबाजी स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, ही क्रीडा क्षेत्रासाठी आनंदाची बाब आहे. तलवारबाजी हा ऑलिम्पिकमधील महत्त्वाचा खेळ असून, या खेळात मुलींनाही भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे मुलींनी तलवारबाजीसारख्या खेळाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर यश संपादन करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले.

वाडिया पार्क येथे शालेय मुलींच्या १४, १७ आणि १९ वर्षांखालील वयोगटातील विभागीय तलवारबाजी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन आज खुरंगे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त महिला खेळाडू श्वेता चंडालिया, तलवारबाजी संघटनेचे शैलेश गवळी, प्रा. संदेश भागवत, महाराष्ट्र पाटोळे सर, घोडके सर, सुनील गोडाळकर आदी उपस्थित होते. या स्पर्धेमुळे शालेय मुलींना आपले क्रीडा कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार असून, भविष्यात राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याच्या दृष्टीने या स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

# अहिल्यानगरच्या वरुण कोल्हेची नेमबाजीत कांस्यपदकाला गवसणी

**राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड; गोव्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत खेळणार**



वरुण कोल्हेने नेमबाजीत कांस्यपदक मिळविल्याबद्दल त्याचा गौरव करण्यात आला.

नगर – नागपूर येथे पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय इंटर स्कूल रायफल शूटिंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या वरुण कोल्हे याने उल्लेखनीय कामगिरी करत कांस्यपदक पटकाविले. १७ वर्षांखालील मुलांच्या ओपन साइड एअर रायफल प्रकारात त्याने हे यश संपादन केले. या कामगिरीच्या जोरावर वरुणची गोवा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धे साठी निवड झाली आहे.

जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर आणि प्रियदर्शनी भगवती अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर यांच्या वतीने २३ ते २५ ऑक्टोबर या कालावधीत शालेय राज्यस्तरीय इंटर स्कूल रायफल शूटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत राज्यातील विविध विभागांतील शालेय नेमबाजांनी सहभाग नोंदविला. सहभागी खेळाडूंनी आपल्या नेमबाजी कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करत पदकांसाठी चुरशीची लढत दिली.

या स्पर्धेत वरुण कोल्हे याने आपल्या अचूक नेमबाजीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात करत कांस्यपदक मिळविले. राज्यस्तरावर मिळविलेल्या या यशामुळे त्याला राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली आहे. गोवा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेत तो अहिल्यानगरचे प्रतिनिधित्व करणार असल्याने त्याच्याकडून आगामी स्पर्धेतही चांगल्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

वरुणने मिळविलेल्या या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने त्याचा गौरव करण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते वरुणचा सत्कार करण्यात आला. वरुणला प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्लबच्या सेक्रेटरी सुनीता लिपने यांनी खेळाडूंच्या तयारीसाठी विशेष प्रयत्न केले.

वरुण कोल्हे याने मिळविलेल्या यशाबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे, अपर जिल्हाधिकारी दादासाहेब गीते–पाटील, वरिष्ठ कक्ष अधिकारी लाड, सोल मॅडम, आ. संग्राम जगताप, खासदार नीलेश लंके, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, क्रीडा अधिकारी प्रियंका खिंडरे, संतोष वाबळे, कोमल वाकळे तसेच खेळाडूंच्या पालकांनी त्याचे अभिनंदन केले.

# मारहाण केल्याच्या आरोपातून सहा आरोपींची निर्दोष मुक्तता

नगर – दोन पोलिसांना मारहाण केल्याच्या आरोपातून जिल्हा न्यायालयाने सहा आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. योगेश देशमुख, सुभाष वराळे, भाऊसाहेब काकडे, दत्तात्रय म्हसे, पांडुरंग वराळे, दिनकर पवार, सर्व रा. राहुरी अशी त्यांची नावे आहेत.

१३ एप्रिल २०१० रोजी राहुरी येथे नगर मनमाड हायवेवर मार्केट यार्ड समोर दुपारी १.०० च्या सुमारास ट्रॅफिक जाम झाल्याने राहुरी पोलिस स्टेशनचे कॉन्स्टेबल श्री. चेमटे व पोलिस नाईक श्री. सुरवसे असे ट्रॅफिक सुरळीत करण्यास गेले असता, तेथील वादावादीतून बाचाबाची झाल्याहुन हे सहा जण तलवार व टॉमी घेऊन आले व त्यांनी पोलिस कॉन्स्टेबल चेमटे यांना तलवार व टॉमीने मारहाण केली त्यात चेमटे जखमी झाले. तसेच सुरवसे पोलिस नाईक यांना पण मारहाण झाली. श्री. चेमटे यांच्या फिर्यादीहुन वरील आरोपींच्या विरुध्द राहूरी पोलिसांनी सरकारी कामात अडथळा आणला व प्राणघातक शस्त्राने गैरकायद्याची मंडळी जमवून मारहाण करणे या कारणाहुन गुन्हा दाखल केला. नगर जिल्हा न्यायालयात या प्रकरणाचीर सुनावणी झाली. न्यायालयात दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांनी त्याप्रमाणे साक्ष दिली. परंतु प्रभावी उलट तपास व युक्तीवाद व श्री. चेमटे हेड कॉन्स्टेबल हे वाहतूक सुरळीत करतांना ट्रकचे केबीनमध्ये चढतांना तेथून रस्त्यावर पडून जखमी झाले व स्थानिक राजकारणाहुन आरोपींना खोटे या प्रकरणात गुंतवले हा आरोपींचा बचाव न्यायालयाने ग्राहय धरत सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. सर्व आरोपींतर्फे ॲड. सतिशचंद्र सुद्रीक यांनी काम पाहिले.



झटपट रेसिपी

# चटपटीत आणि कुरकुरीत कॉर्न

दोस्तांनो, येता-जाता तोंडात टाकण्यासाठी काही तरी लागतं. संध्याकाळी एखादा कुरकुरीत खमंग पदार्थ चहाची लज्जत वाढवतो. अशा वेळी तुम्ही झटपट तयार होणारे क्रिस्पी कॉर्न बनवू शकता. चला तर, करु या.

**सामग्री:** पाणी, एक कप कॉर्न, लाल तिखट, प्रत्येकी एक चमचा जिरे पूड, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ, दोन ते तीन चमचे कॉर्न फ्लोर, तेल, चिरलेला कांदा आणि कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात कॉर्न घालून पाच मिनिटे शिजवून घ्या. पाणी काढून कॉर्न थंड करायला ठेवा. थंड झाल्यावर कॉर्नमध्ये कॉर्न फ्लोर आणि मीठ घाला. नीट मिक्स करून घ्या. आता कढईत तेल तापवा. तेल गरम झाल्यावर त्यात कॉर्न घाला. सोनेरी रंगावर तळून घ्या. भांड्यात काढून घ्या. दुसऱ्या भांड्यात लाल तिखट, जिरेपूड, चाट मसाला आणि थोडं मीठ एकत्र करा. तळलेल्या कॉर्नवर आपल्या चवीनुसार हा मसाला घाला. त्यावर चिरलेला कांदा आणि कोथिंबिर घालून हलवून घ्या. थोडं लिंबू पिळा.




## शेर की जुबानी

अच्छे तो सभी होते है, बस पहचान बुरे वक्त में होती है।

दो पल की जिंदगी के दो नियम, निखरो फुलों की तरह और बिखरो खुशबू की तरह

लिखी हुई बात को प्रत्येक पढनेवाला नहीं समझ सकता, क्योंकि लिखनेवाला भावनाएं लिखता है, और लोग केवल शब्द पढते हैं।

अचिव्हर

# उभी केली कोट्यवधींची कंपनी

यश मिळवण्यासाठी मोठी आर्थिक पार्श्वभूमी किंवा भरपूर भांडवलच आवश्यक असते असे नाही. मेहनत, जिद्द आणि योग्य संधीचा उपयोग करण्याची तयारी असेल, तर अगदी कमी पैशांतूनही व्यवसाय उभा करता येतो. तामिळनाडूतील बसवराज एस. यांची कहाणी याचे उदाहरण आहे. नोकरी गेल्यानंतर हातात केवळ एक हजार रुपये घेऊन त्यांनी बेंगळुरू गाठले आणि पुढे पर्यावरणपूरक गिफ्टिंग स्टार्टअप उभे केले.

बसवराज यापूर्वी नोकरी करत होते; मात्र एका दिवशी त्यांची नोकरी गेली. त्यानंतर ते घरी परतले आणि वडिलांना नोकरी गेल्याची माहिती दिली. यामुळे नाराज झालेल्या वडिलांनी त्यांना एक हजार रुपये देऊन घराबाहेर पडण्यास सांगितले. हातात असलेल्या या एक हजार रुपयांव्यतिरिक्त त्यांच्याकडे फारसे काही नव्हते. हेच पैसे घेऊन ते बेंगळुरूला आले. काहीतरी करून दाखवेपर्यंत घरी परतायचे नाही, असा निर्धार त्यांनी केला.

बसवराज यांच्याकडे काही जुनी बचत होती. या पैशांच्या मदतीने त्यांनी कंबर प्रॉडक्ट्स अँड सर्व्हिसेस ही कंपनी सुरू केली. या माध्यमातून युनिफॉर्म, सुरक्षा साहित्य आणि कार्यालयीन वस्तूंचा पुरवठा केला जात होता; मात्र व्यवसायाला वेग मिळण्याआधीच कोरोना महामारी आणि लॉकडाउनचा काळ सुरू झाला. लॉकडाउनमुळे व्यवसायावर मोठा परिणाम झाला आणि बसवराज यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले. कोरोनाच्या काळातील संकटातूनच त्यांना नव्या व्यवसायाची कल्पना सुचली. पर्यावरणपूरक वस्तू आणि गिफ्टिंग उत्पादनांच्या क्षेत्रात संधी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी 'राफ्टर' नावाची कंपनी सुरू केली. राफ्टरकडून बांबूच्या बाटल्या, तांदळाच्या भुशीपासून तयार केलेले मग आणि इतर पर्यावरणपूरक गिफ्टिंग वस्तू तयार केल्या जातात. कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना आणि व्यावसायिक भागीदारांना अशा वस्तू भेट म्हणून देत असल्याने या उत्पादनांना मागणी मिळू लागली.




आज राफ्टर विविध कंपन्यांना आपल्या उत्पादनांचा पुरवठा करते. कंपनीकडे पाच हजारांहून अधिक उत्पादनांचा पोर्टफोलिओ असल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे. कंपनीचा महसूल सुमारे एक कोटी रुपये आहे. केवळ एक हजार रुपयांपासून सुरू झालेला प्रवास, नोकरी गमावणे, व्यवसायातील अडचणी आणि कोरोना संकट अशा अनेक आव्हानांतून पुढे जात पर्यावरणपूरक उत्पादनांच्या व्यवसायापर्यंत पोहोचला. बसवराज यांची ही कहाणी कमी भांडवलातून व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

टेक्नो टॉक

## आयफोनमध्ये नवे व्हॉट्सॲप फीचर



युजर्सचा व्हॉट्सॲप वापरण्याचा अनुभव आणखी जलद आणि सुटसुटीत करण्यासाठी कंपनीने एक नवा आणि उपयुक्त बदल केला आहे. व्हॉट्सॲपने 'आयओएस' युजर्ससाठी थेट चॅट स्क्रीनवरच 'इन-चॅट सर्च शॉर्टकट' हे नवे फीचर रोलआऊट करण्यास सुरुवात केली आहे. या सुविधेमुळे आता युजर्सना चॅट्स किंवा चॅनेल्समधील जुने महत्त्वाचे मेसेजेस शोधण्यासाठी वेगळ्या पर्यायांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. आत्तापर्यंत व्हॉट्सॲपवर एखाद्या चॅटमधील जुना मेसेज शोधण्यासाठी यूजर्सना आधी चॅट किंवा 'प्रोफाइल इन्फो स्क्रीन' उघडावी लागत होती आणि तिथून 'सर्च' पर्याय निवडावा लागत होता. या नव्या अपडेटमुळे हा लांबलचक प्रवास पूर्णपणे टळणार आहे.

**शॉर्टकट बटण :** युजर जेव्हा चॅटमध्ये जुने मेसेजेस पाहण्यासाठी वरच्या बाजूला स्क्रोल करतो, तेव्हा स्क्रीनवर 'नेव्हिगेशन बार'च्या ठीक खाली हे नवे सर्च शॉर्टकट बटण आपोआप दिसायला लागते.

**वन-टॅप ॲक्सेस :** या बटणावर क्लिक करताच चॅट स्क्रीनवरच डायरेक्ट 'सर्च मोड' सुरू होतो, तिथे की-वर्ड टाकून जुना मेसेज किंवा माहिती क्षणात शोधता येते.

**स्मार्ट डिझाइन :** युजर जेव्हा पुन्हा लेटेस्ट (नवीन) मेसेजेसकडे खाली स्क्रोल करतो, तेव्हा हे बटण आपोआप गायब होते. त्यामुळे चॅटिंगचा मूळ इंटरफेस अतिशय स्वच्छ राहतो.

**व्हॉट्सॲप चॅनेल्ससाठीही मोठा फायदा**

हा सर्च शॉर्टकट फक्त वैयक्तिक किंवा ग्रुप चॅट्सपुरता मर्यादित नसून, तो व्हॉट्सॲप चॅनेल्ससाठीही लागू करण्यात आला आहे. ज्या चॅनेल्सवर सतत मोठ्या प्रमाणावर अपडेट्स येत असतात, तिथे जुनी माहिती शोधणे कठीण जायचे. आता चॅनेलच्या मुख्य इन्फो पेजवर न जाता, युजर्स थेट चॅनेल स्क्रीनवर स्क्रोल करून जुने अपडेट्स सहज शोधू शकणार आहेत.

**रोलआऊट अन् उपलब्धतेविषयीची माहिती**

व्हॉट्सॲपच्या या नव्या बदलावर लक्ष ठेवणाऱ्या 'डब्ल्यूएबीटाइन्फो'च्या रिपोर्टनुसार, ॲप स्टोअरवर उपलब्ध असलेल्या 'व्हॉट्सॲप मेसेंजर फॉर आयओएस'च्या व्हर्जन २६.३६.७४ मध्ये हे फीचर दिसले आहे. ऑगस्ट महिन्यात जेव्हा हे फीचर टेस्टिंगमध्ये होते, तेव्हा हे बटण स्क्रीनच्या अगदी खाली ठेवण्यात आले होते; पण युजर्सचा सोयीस्कर अनुभव लक्षात घेऊन अंतिम रोलआऊटमध्ये कंपनीने हे बटण टॉप नेव्हिगेशन बारजवळ शिफ्ट केले आहे. सध्या हे फीचर टप्प्याटप्प्याने रोलआऊट होत असून, येणाऱ्या काही आठवड्यांमध्ये सर्व सपोर्टेड आयफोन युजर्सपर्यंत ते पोहोचेल.

शैक्षणिक वार्ता

# बारावीच्या गुणांच्या सरासरीवर प्रवेश




राज्यातील अभियांत्रिकी आणि औषध निर्माणशास्त्र पदवी प्रवेशप्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश केवळ 'एमएचटी-सीईटी'च्या गुणांवर न होता, बारावी बोर्डाच्या गुणांनाही त्यात समान प्राधान्य दिले जाणार आहे. या दोन्ही परीक्षांच्या गुणांचा समतोल साधणारे नवे धोरण निश्चित करण्यासाठी सरकारने उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात बारावीत काठावर पास झालेल्या किंवा अत्यंत कमी गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांनी 'सीईटी'त थेट ९९ पर्सेंटाइल मिळवल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले. यामुळे सीईटीच्या संपूर्ण गुणपद्धतीवर, उत्तरतालिकेवर आणि गोपनीयतेवरच गंभीर संशय व्यक्त केला जात होता. यावर शैक्षणिक वर्तुळातून उठलेल्या प्रचंड वादळानंतर आणि पालकांच्या वाढत्या उद्रेकानंतर प्रशासनाने प्रवेश पद्धतीत आमूलाग्र बदल करण्यासाठी ही पावले उचलली आहेत. 'सीईटी' कक्षाच्या आयुक्तांनी २ सप्टेंबरला दिलेल्या प्रस्तावाची गंभीर दखल घेत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने १७ सप्टेंबरला अध्यादेश काढत तज्ज्ञ समिती स्थापन केली. अभियांत्रिकी आणि औषध निर्माणशास्त्र पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 'एमएचटी-सीईटी' पर्सेंटाईल आणि बारावी परीक्षेतील गुणांची टक्केवारी विचार करून गुणवत्ता यादी निश्चित करण्याचे धोरण ही समिती ठरवणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची ही समिती आहे. अध्यक्षांना गरजेनुसार संबंधित विषयतज्ज्ञांना बैठकीसाठी बोलविण्याचा अधिकार असणार आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेतील गुण आणि 'सीईटी'चे गुण या दोन्ही घटकांना योग्य प्रमाणात महत्त्व देऊन गुणवत्ता यादी निश्चित करण्याबाबत धोरणनिश्चितीसाठी शिफारस करणे. गुणवत्ताक्रम निश्चितीची पद्धत अधिक पारदर्शक, वस्तुनिष्ठ आणि सर्व विद्यार्थ्यांसाठी समतोल साधण्यासाठी गुणांकनाचे प्रमाण निश्चित करणे ही उद्दिष्टे आहेत. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या अध्यक्षतेखालील या समितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (लोणेरे), 'सीओईपी' तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू आणि उच्च शिक्षण संचालक सदस्य असतील. तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सदस्य सचिव असतील.

**नवा नियम कधीपासून?**

बारावी बोर्डाचे गुण आणि 'सीईटी'तील पर्सेंटाइल यांचा न्याय्य समतोल साधणारी नवी गुण पद्धती आखणे हे या समितीचे मुख्य उद्दिष्ट असणार आहे; मात्र ऐनवेळी नियम बदलल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नियोजन बिघडू नये, यासाठी हा नवा नियम आगामी प्रवेश प्रक्रियेपासूनच लागू करायचा की पुढील शैक्षणिक वर्षापासून, याबाबतही समिती स्पष्ट शिफारस करणार आहे. या निर्णयामुळे प्रवेशाचे नियम बदलणार असल्याचे स्पष्ट असून, सर्वांचे लक्ष समितीच्या अहवालाकडे आहे.

ग्रुमिंग

# कोणते शर्ट निवडावेत?

चेक शर्ट खरेदी करायला गेल्यानंतर तुमच्या मनात अनेक प्रश्न उपस्थित होत असतील. मला व्यवस्थित दिसेल का? माझ्यावर कोणता रंग सूट होईल का? ऑफिसमध्ये हे कपडे चालतील का? यासारखे अनेक प्रश्न पडत असतील. कारण.. स्टाइल म्हटल्यानंतर सर्वात पहिल्यांदा कपड्यांना पाहिलं जातं. त्यानंतर इतर गोष्टींकडे पाहतात. चेक शर्ट खरेदी करताना काय काळजी घेतली पाहिजे किंवा कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात.

**शर्टचा रंग**

चेक शर्ट घेताना सर्वात आधी रंग पाहून मुलं खरेदी करतात; पण लक्षात ठेवा चेक शर्ट खरेदी करताना न्यूट्रल रंगाच्या शर्टची निवड करा. तुमच्या अंगावर डार्क रंग सूट होत असेल, तरच तसा चेक शर्ट खरेदी करा.

**फॅब्रिक**

चेक शर्ट खरेदी करताना फॅब्रिककडे लक्ष ठेवा. अशा पद्धतीने फॅब्रिक निवडा जे उघडा आणि बटन लावल्यानंतर शर्ट चांगला दिसेल.

**पॅटर्न**

चेक शर्ट खरेदी करताना रंगाबरोबरच पॅटर्नकडेही तेवढेच लक्ष द्या. जसे छोटे चेक्स शर्ट स्मार्ट लूक देतात, तर मोठ्या चेक्सचे शर्ट कॅज्युअल लूकसाठी परफेक्ट आहेत.



**चेक्स आहे बोल्ड पॅटर्न**

चेक्सचे कपडे बोल्ड पॅटर्नमध्ये ग्राह्य धरले जातात. त्यामध्ये अनेक प्रकारचे विकल्प असतात. पुरुषांनी नेहमीच प्लेन किंवा लायनिंगवाले कपडे न घेता चेक्स शर्टचीही निवड करावी. तुमचा लूक आधिक चांगला दिसू शकतो.

एआय वर्ल्ड




## एआयवर प्रश्न एक, उत्तरे अनेक!

आजच्या काळात 'एआय' चॅटबॉट्सचा वापर झपाट्याने वाढत आहे. अभ्यास, ऑफिसचे काम, कंटेंट रायटिंग, माहिती मिळवणे यांसह अनेक कामांसाठी चॅटजीपीटी, गुगल जेमिनी, क्लाऊड यांसारख्या एआय टूल्सचा वापर केला जात आहे. मात्र, या तिन्ही एआय टूल्सना अगदी एकच प्रश्न विचारला, तरी अनेकदा त्यांच्या मिळणारी उत्तरे वेगवेगळी असतात. अशा वेळी प्रश्न पडतो की, प्रश्न एकच असताना उत्तर वेगवेगळे का येते? यामागे अनेक तांत्रिक कारणे असतात.

**वेगवेगळ्या कंपन्यांचे 'एआय' मॉडेल्स**

चॅटजीपीटी, गुगल जेमिनी आणि क्लाऊड ही वेगवेगळ्या कंपन्यांनी विकसित केलेली 'एआय' मॉडेल्स आहेत. त्यांना वेगवेगळ्या प्रकारचा डेटा, पद्धती आणि प्रशिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून तयार करण्यात आले आहे. एखाद्या 'एआय' मॉडेलला भाषा समजून घेण्यासाठी आणि त्यावर आधारित उत्तर तयार करण्यासाठी ज्या प्रकारचा डेटा आणि 'फाइन-ट्युनिंग' दिले जाते, त्याचा थेट परिणाम त्याच्या उत्तरावर होतो. म्हणजेच, एकच प्रश्न समोर आल्यानंतरही वेगवेगळी 'एआय' मॉडेल्स त्या प्रश्नाचा संदर्भ आणि शब्दांचा अर्थ वेगवेगळ्या पद्धतीने समजू शकतात. त्यामुळे एखाद्या प्रश्नाचे उत्तर एक मॉडेल थोडक्यात देऊ शकते, तर दुसरे मॉडेल त्याच विषयाचे सविस्तर स्पष्टीकरण देऊ शकते. वेगवेगळ्या 'एआय' मॉडेल्समध्ये आर्किटेक्चर, पॅरामीटर्स आणि तंत्रज्ञान वेगवेगळे असते. त्यामुळे एकच इनपुट दिल्यानंतर त्यांचा आऊटपुटही अगदी सारखाच असेल, असे आवश्यक नाही. काही 'एआय' सिस्टीम गरजेनुसार वेबवरून ताजी माहिती मिळवू शकतात, तर काही परिस्थितींमध्ये मॉडेल आपल्या उपलब्ध ज्ञानावर अवलंबून राहू शकते. त्यामुळे एकाच प्रश्नाच्या उत्तरात वेगवेगळे तथ्य, उदाहरणे किंवा तारखा पाहायला मिळू शकतात. त्यामुळे ताज्या घडामोडींशी संबंधित प्रश्न विचारताना 'एआय' ने दिलेल्या उत्तरातील सोर्स आणि माहितीची तारीख तपासणे महत्त्वाचे ठरते.

**'एआय'च्या सेटिंग्जमुळेही बदलू शकते उत्तर**

'एआय' मॉडेलच्या उत्तरावर त्याच्या इंटरनल सेटिंग्जचाही परिणाम होतो. याच कारणामुळे कधी-कधी एकाच 'एआय' ला एकच प्रश्न दोन वेळा विचारला, तरी त्यातील शब्दरचना, उदाहरणे किंवा मांडणीत थोडा फरक दिसू शकतो; मात्र साध्या तथ्यात्मक प्रश्नांमध्ये मूलभूत माहिती शक्य तितकी समान राहणे अपेक्षित असते. त्यामुळे 'एआय' कडून मिळालेल्या महत्त्वाच्या किंवा ताज्या माहितीची विश्वसनीय स्रोतांकडून पडताळणी करणे नेहमीच महत्त्वाचे आहे.

एज्युकेशन पॉलिसी

# उच्च शिक्षणाचे जाळे विस्तारतेय




उच्च शिक्षण हा भारताच्या ज्ञान-आधारित अर्थव्यवस्थेच्या दिशेने होणाऱ्या प्रवासाचा एक प्रमुख आधारस्तंभ आहे आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२०चादेखील एक प्रमुख आधारस्तंभ आहे. हे धोरण अशा शिक्षण प्रणालीची कल्पना करते, जी सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षणाला प्रोत्साहन देते आणि शाश्वत विकास ध्येय (एसडीजी)-४-ची उद्दिष्टे साध्य करण्यास मदत करते. शाश्वत विकास ध्येयचा उद्देश सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि समान दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करणे आणि आजीवन शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देणे हा आहे. शिक्षण मंत्रालय भारतातील उच्च शिक्षण संस्थांचे वार्षिक सर्वेक्षण करते.

शिक्षण मंत्रालयाद्वारे दरवर्षी आयोजित केले जाणारे 'अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण', देशभरातील उच्च शिक्षण संस्थांबद्दल व्यापक आणि ठोस माहिती प्रदान करते. ही माहिती 'एनईपी' २०२० अंतर्गत उच्च शिक्षण सुधारणांच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी, नव्याने निर्माण होणाऱ्या उणिवा ओळखण्यासाठी आणि धोरणात्मक निर्णयांना दिशा देण्यासाठी उपयुक्त ठरते. गेल्या दशकात भारताच्या उच्च शिक्षण जाळ्याचा लक्षणीय विस्तार झाला आहे. विद्यापीठांची संख्या २०१४-१५ मधील ७६० वरून २०२३-२४ मध्ये १,२८१ झाली, म्हणजेच ६९.६ टक्के वाढ झाली. महाविद्यालयांची संख्या ३८,४९८ वरून ४८,२४६ झाली, म्हणजेच २५.३ टक्के वाढ झाली. स्वतंत्र संस्थांची संख्या १२,२७६ वरून १५,२२१ झाली, म्हणजेच अंदाजे २४ टक्के वाढ झाली.

# जीवनाचा प्रवास ध्येयनिष्ठ हवा!

करिअर आणि जीवनात यश मिळवण्यासाठी ध्येयनिर्धारण ही पहिली आणि अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. म्हणूनच स्वतःची ध्येये ठरवणे आणि ती गाठण्यासाठी योजना आखणे गरजेचे ठरते.

**तुमची कौशल्ये ओळखा :** तुमची ताकद आणि कमकुवतता कोणती?

**तुमची मूल्ये समजून घ्या :** जीवनात सर्वात महत्त्वाचे काय आहे? कुटुंब, करिअर, समाजसेवा, आर्थिक स्वातंत्र्य हे शोधा.

**स्मार्ट ध्येये ठरवा:** ध्येय स्पष्ट आणि विशिष्ट असावे. उदा. 'नोकरी मिळवायची' ऐवजी 'मार्केटिंग मॅनेजरची नोकरी मिळवायची.' असे ठरवा. ध्येय असे ठरवा की प्रगती मोजता येईल. उदाहरणार्थ, 'पगार २० टक्के वाढवायचा?' हे ध्येय असेल तर मोजदाद करता येईल. मुख्य म्हणजे ध्येय प्राप्त करणे शक्य असावे. दुसरे म्हणजे ध्येय तुमच्या मूल्यांशी आणि दीर्घकालीन योजनांशी जुळले पाहिजे. प्रत्येक ध्येयासाठी मुदत निश्चित करा. दीर्घकालीन आणि अल्पकालीन ध्येये ठरवा. दीर्घकालीन ध्येय जसे की, 'स्वतःचा व्यवसाय सुरू करणे', 'व्यवस्थापकीय पद गाठणे' होय तर अल्पकालीन ध्येय म्हणजे 'प्रमाणपत्र मिळवणे', 'नवीन कौशल्य शिकणे' असे असू शकेल.


स्वतःला घडवताना...

वेळोवेळी ध्येयांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. अपयश आल्यास नाउमेद होऊ नका तर ते धडा म्हणून स्वीकारा. कधीही पारंपरिक भूमिकांमुळे बांधील होऊ नका. सकारात्मक लोकांच्या वर्तुळात राहा. नकारात्मक विचार दूर करा. लहान-लहान यशांचेही कौतुक करा. गरज लागेल तेव्हा चर्चा करून कुटुंबाची मदत मागा. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या सगळ्याची सुरुवात आजच करा.

भटकंती

# पधारो म्हारे देस...

आल्हाददायक वातावरणात राजस्थानला जाण्याचे प्लॅन करू शकता. राजस्थानची ही पाच ठिकाणे फिरण्यासाठी परफेक्ट डेस्टिनेशन ठरतील.





**बुंदी**

हे ठिकाण त्याच्या वास्तुकलेसाठी, शांत वातावरणासाठी प्रसिद्ध आहे. चांगली गोष्ट म्हणजे येथे पर्यटकांची गर्दी कमी असते. फोटोग्राफी लव्हर्ससाठी हे ठिकाण उत्तम मानले जाते. हे राजस्थानमधील अशा शहरांपैकी एक आहे, जिथे तुम्हाला मोठ्या पर्यटन स्थळांपेक्षा थोडे वेगळे, जुने आणि ऑथेंटिक राजस्थान पाहायला मिळेल. शहराचे निळे रस्ते, जुने राजवाडे, बावड्या, डोंगरी किल्ला ही त्याची खास वैशिष्ट्ये आहेत. डोंगरावर वसलेला तारागड किल्ला, बुंदी आणि आजूबाजूच्या परिसराची विहंगम दृश्ये पाहण्यासाठी उत्कृष्ट आहे. येथे फिरताना योग्य वॉकिंग शूज सोबत ठेवा.

**भरतपूर**

हे ठिकाण वन्यजीव, पक्षी निरीक्षण, निसर्गभ्रमण आणि फॅमिली ट्रीपसाठी बेस्ट मानले जाते. केवलादेव राष्ट्रीय उद्यान हे येथील मुख्य आकर्षण आहे, जे पक्षी निरीक्षणासाठी प्रसिद्ध आहे. या भागात भेट देत असल्यास, सकाळी लवकर पोहोचा आणि सायकलिंग, चालणे किंवा सायकल रिक्षा यांपैकी पर्याय निवडा. ऑक्टोबर महिन्यात विंटर बर्ड सीझनची सुरुवात होते. त्यामुळे या भागाला भेट देण्यासाठी हा एक आदर्श महिना आहे.

**अलवर**

फिरण्यासाठी अलवर हे एक उत्तम ठिकाण आहे. येथे तुम्ही विविध किल्ले, वन्यजीव आणि तलाव पाहू शकता. टेकडीवर वसलेला भव्य बाला किल्ला पाहण्यासारखा आहे. येथून तुम्ही अलवरच्या आजूबाजूचा परिसर पाहू शकता. जर तुम्हाला कमी वेळात राजस्थानचा अनुभव घ्यायचा असेल, तर हे एक चांगले ठिकाण आहे.

**जैसलमेर**

वाळवंट, किल्ले, कॅम्पिंग आणि सनसेटचा आनंद घेण्यासाठी हे एक उत्तम ठिकाण आहे. राजस्थानच्या शाही जीवनाचा अनुभव घेण्यासाठी हे सर्वोत्तम ठिकाण मानले जाते. शहराच्या मध्यभागी असलेला भव्य जैसलमेर किल्ला पाहण्यासारखा आहे. येथील तलाव सकाळच्या किंवा संध्याकाळच्या फेरफटका मारण्यासाठी सर्वोत्तम आहे. याव्यतिरिक्त डेझर्ट कॅम्पमध्ये तुम्ही उंट सफारी, जीप सफारी, सनसेट, राजस्थानी नृत्य आणि पारंपरिक खाद्यपदार्थांचा आनंद घेऊ शकता. सकाळच्या तुलनेत संध्याकाळी वाळवंटातील तापमान लक्षणीयरीत्या कमी होते. त्यामुळे सोबत एक हलके जॅकेट आणि शाल नक्की ठेवा.

**उदयपूर**

आपल्या प्रिय व्यक्तीसोबत भेट देण्यासाठी हे एक उत्तम ठिकाण आहे. तलाव आणि राजवाडे पाहण्यासाठी, तसेच राजस्थानी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी हे कपल्ससाठी आणि कुटुंबांसाठी एक उत्तम ठिकाण आहे. सिटी पॅलेस हे उदयपूरच्या सर्वात प्रसिद्ध आकर्षणांपैकी एक आहे.

# बुऱ्हाणनगर ख्रिस्ती दफनभूमीच्या दुरवस्थेकडे वेधले लक्ष

## समस्त ख्रिस्ती समाजाचे भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाला निवेदन

नगर – बुऱ्हानगर येथील ख्रिस्ती दफनभूमीच्या प्रवेशद्वारासमोर तसेच परिसरात अनधिकृतपणे टाकण्यात येणारी मृत जनावरे आणि टाकाऊ साहित्य यांची तातडीने विल्हेवाट लावावी, तसेच दफनभूमीची दुरुस्ती करून परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवावा, अशी मागणी समस्त ख्रिस्ती समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास वैष्णवी यांना निवेदन देण्यात असून संबंधित प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ख्रिस्ती समाजाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.



बुऱ्हानगर येथील ख्रिस्ती दफनभूमीच्या प्रवेशद्वारासमोर तसेच परिसरात अनधिकृतपणे टाकण्यात येणारी मृत जनावरे आणि टाकाऊ साहित्य यांची तातडीने विल्हेवाट लावावी, तसेच दफनभूमीची दुरुस्ती करून परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवावा, या मागणीचे निवेदन भिंगार कॅन्टोन्मेंट प्रशासनाला देताना अहिल्यानगर येथील समस्त ख्रिस्ती समाज.

यावेळी संत जॉनचे प्रमुख धर्मगुरू फादर विश्वास परेरा, संत आन्ना चर्चचे प्रमुख धर्मगुरू फादर मॅकेनरो लोपीस, पवित्र तारकाचे मंडळी चर्च फास्टर विजय काकडे, ह्युमन मेमोरियल चर्चचे सेक्रेटरी राजविलास साळवे, निता बर्वे, नलिनी गायकवाड, मार्गरेट जाधव, नायाब तहसीलदार सुनील बनसोडे, बबन निकाळे, दीपक साळवे, संदीप पवार, राजू देठे, विशाल केदारी, अमोल काळे, राजन तेलोरे, सागर जाधव, राजू अगस्तीन, विक्टर पवार, संजय मकासरे, रमेश भोसले, किरण पवार, आदीसह नगर शहर व भिंगार शहरातील ख्रिश्चन समाजाचे बांधव उपस्थित होते.

बुऱ्हानगर येथील ख्रिस्ती दफनभूमी ही ख्रिस्ती समाजासाठी धार्मिक, सामाजिक आणि भावनिकदृष्ट्या महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी दिवंगत व्यक्तींवर अंत्यसंस्कार करण्यासह विविध धार्मिक विधी पार पाडले जातात. त्यामुळे या परिसराची स्वच्छता, पावित्र्य आणि सुरक्षितता जपणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, दफनभूमीच्या प्रवेशद्वारासमोर आणि परिसरालगत काही व्यक्तींकडून मृत जनावरे तसेच टाकाऊ साहित्य आणून टाकले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. यामुळे परिसरात अस्वच्छता निर्माण होण्याबरोबरच दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## गुरुवाणी – ९३
## ब्रम्हचर्येचे प्रोटोकॉल



जी परिस्थिती येते तिचा स्वतःच्या विकासासाठी उपयोग केला पाहिजे. कोणत्याही चांगल्या वाईट परिस्थितीत स्वतःच्या आत्म्याचा शोध चालू राहीला पाहिजे. आपण प्रभू भक्ती करतो तेव्हा त्यांच्या कृपेची अपेक्षा असते. एखाद्या सत्ताधीशाची प्रशंसा केली तर सत्तेचा लाभ मिळावा अशी अपेक्षा निर्माण होते. जे मिळेल त्याबाबत तक्रार करायची नसते. जो जितेंद्रीय असतो त्याला परमात्मा सिद्ध मार्गावर चालणारा भिक्षू म्हणतात. ब्रम्हचर्य जीवन ओजस्वी असते. तीर्थंकर ब्रम्हचर्यात आनंदाची अनुभूती घेण्याची व्यवस्था देतात. अहिंसा, सत्य, अचौर्य, अपरिग्रह, ब्रम्हचर्य ही पाच तत्व आहेत. ब्रम्हचर्ये साठी १० प्रोटोकॉल दिलेत. ते पाळले तरच आनंदाची अनुभूती येईल. आताच्या काळात भोग प्रतिष्ठित झाले आहेत. त्याला नैसर्गिक म्हणून समोर आणले जाते. खरं तर पशुपक्षी नॅचरल आहेत, माणूस कल्चरल असला पाहिजे. प्रोटोकॉलसह ब्रम्हचर्य पालन केले तर जग त्याला वंदन करते. पहिला प्रोटोकॉल आहे, ब्रम्हचारी पुरूषाने स्त्रीचे वास्तव्य असलेल्या जागेत राहायचे नसते. महिला ब्रम्हचारीने पुरुष असलेल्या जागेत राहायचे नसते. ब्रम्हचारी महिला, पुरुष बरोबर बसत नाही. भारतात पूर्वी मुले मुली वेगवेगळे बसत. परंतु आताच्या काळात शाळेत दोघे एकत्र बसून शिक्षण घेतात. त्याचे वाईट परिणाम समाजात पहायला मिळत आहेत. ब्रम्हचारींनी भिन्नलिंगी विषयी कसलीही चर्चा करायची नाही. विजातीयाकडे आसक्तीने पहायचे नसते. विकार जागृत करणारे शब्द ऐकायचे नाहीत. कारण शब्दांमुळे मनात भाव निर्माण होतात. मसालेदार भोजन टाळायचे. अशा भोजनामुळे मनात निर्मल भाव राहणार नाहीत. एक प्रयोग करा, भरपेट,अतिमात्रेत खायचे नाही. उपाशीपोटी झोपला तर आजारांपासून दूर राहाल. आचार्य गुरूदेवांनी पूज्य रत्नऋषीजी महाराज यांच्या निर्वाणानंतर कधी सायंकाळी गोचरी केली नाही. शरीराला मेकअप केला तर वासनेचा जन्म होतो, म्हणून मेकअप टाळला पाहिजे. कपडे अंग झाकण्यासाठी असतात, अंग प्रदर्शनासाठी नसतात. परमात्मा सांगतात की, प्रोटोकॉल तोडले तर मनात ब्रम्हचर्याविषयीच शंका निर्माण होईल. एकदा शंका निर्माण झाली की विकारांप्रती आकर्षण वाढते आणि विकृत चिकित्सा सुरू होते. अशी व्यक्ती धर्म भ्रष्ट होते. देशनाचा २९ वा अध्याय खूप सखोल आणि वैज्ञानिक आहे. या अध्यायाचे आयुष्यात आचरण केले तर हॉस्पिटलची गरज पडणार नाही. आपल्या परिवारात आठवड्यातून एक दिवस आयंबिल भोजन परंपरा सुरू करा. मसालेदार, बाहेरच खाणं पूर्ण बंद करा. डॉक्टरही आजकाल हाच सल्ला देतात.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# वाळुंज शिवारातून पार्किंग केलेल्या दोन ट्रकची चोरी

नगर –नगर तालुक्यातील वाळुंज शिवारातील एचपी पेट्रोल पंप लगतच्या मोकळ्या जागेतून पार्क करून ठेवलेल्या २० लाख रुपये किमतीच्या दोन आयशर गाड्या (ट्रक) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत युवराज रामचंद्र शेलार (वय ४२, धंदा ट्रान्सपोर्ट, रा. उरवडे, ता. मुळशी, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे ट्रान्सपोर्ट व्यवसाय करतात. त्यांनी त्यांच्या मॅक्स डी जी प्रो ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस प्रा. लि. या कंपनीच्या नावावर आयशर कंपनीची ८ लाख रुपये किमतीची सहा टायर गाडी (क्र. एमएच १२ डब्ल्यूएक्स ६४४६) आणि १२ लाख रुपये किमतीची बारा टायर गाडी (क्र. एमएच १२ डब्ल्यूएक्स ६५५३) खरेदी केल्या होत्या. या गाड्या अहिल्यानगर परिसरात भाड्याने चालवण्यासाठी ठेवण्यात आल्या होत्या. २६ सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजता चालकाने बारा टायर गाडी वाळुंज बायपास पुढील अरणगाव रस्त्यावरील एचपी पेट्रोल पंपाजवळील सर्व्हिस रोड लगतच्या मोकळ्या जागेत उभी केली होती. त्यानंतर २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजता दुसरी सहा टायर गाडी देखील त्याच ठिकाणी पहिल्या गाडी शेजारी उभी करण्यात आली व चालक आपापल्या गावी निघून गेले होते. त्यानंतर ९ ऑक्टोबर रोजी चालकाने फिटनेससाठी गाडी नेण्याकरिता येऊन पाहिले असता दोन्ही गाड्या त्या ठिकाणी दिसून आल्या नाहीत. आजूबाजुच्या पार्किंगमध्ये शोध घेऊनही गाड्या न सापडल्याने त्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची खात्री झाली.

या प्रकरणी युवराज रामचंद्र शेलार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार मंगेश खरमाळे करत आहेत.



## 'मैत्र ८१' व 'वुई आर नगरकर' ग्रुपतर्फे दिशान गांधी याचा सत्कार

कॉर्फबॉल क्रीडा प्रकारात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर अहिल्यानगरचा पुत्र दिशान गांधी याने चमकदार कामगिरी करत नगरचा नावलौकिक वाढवला आहे. याबद्दल त्याचा 'मैत्र ८१' आणि 'वुई आर नगरकर' ग्रुपतर्फे सत्कार करण्यात आला. दिशानला आई बबिता व वडील किशोर गांधी यांनी लहानपणापासूनच खेळासाठी प्रोत्साहन व पाठबळ दिले आहे. याप्रसंगी विजया पाटील, प्रा. संजय धोपावकर, जगदीश झालानी, विजय कोथिंबीरे, संजय क्षीरसागर, संजय देशमुख, संगिता काटे, भरत सुवर्णकार, नरेंद्र कोल्हारे, अन्वर शेख, डॉ. राजेंद्र शहाणे, महेंद्र दिवाणे, सुषमा कटारिया, सेना भंडारे, जयश्री बोरूडे, संगिता बर्वे आदी उपस्थित होते.






# 'कार्यालयीन कामकाजात एआयचा वापर कसा करायचा' यावर अहिल्यानगरमध्ये २८ ऑक्टोबर रोजी तज्ज्ञ करणार मार्गदर्शन

नगर – शासकीय कार्यालयांमधील मराठी कामकाज अधिक सुलभ, गतिमान आणि प्रभावी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर कसा करता येईल, याबाबत मनपा कर्मचारी यांना लेखक–वक्ते विवेक मेहत्रे मार्गदर्शन करणार आहेत. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने २८ ऑक्टोबर सकाळी १० वाजता या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असल्याचे महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.




महापालिकेच्या माझी वसुंधरा उपक्रम ंतर्गत आयोजित या व्याख्यानात कार्यालयीन मराठी कामकाजात एआय तंत्रज्ञानाचा वापर, त्याची उपयुक्तता आणि दैनंदिन कामकाजात त्याचा प्रभावीपणे उपयोग करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले जाणार आहे. शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर अधिक सुलभ करण्यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कामाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने हे व्याख्यान महत्त्वाचे ठरणार आहे. महापालिकेच्या माऊली संकुल सभागृहात, झोपडी कॅन्टीन येथे होणाऱ्या या व्याख्यानास महापालिकेतील अधिकारी–कर्मचारी तसेच नागरिक आणि पत्रकारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.






हर काम देश के नाम

भारत सरकार | Government of India
रक्षा मंत्रालय | Ministry of Defence
अहिल्यानगर छावनी परिषद | Ahilyanagar Cantonment Board

अेएमएक्स चौक कॅम्प, भिंगार, अहिल्यानगर ४१४००२ AMX Chowk, Camp, Bhingar, Ahilyanagar - 414002
दुरभाष संख्या. Phone No.:- 0241 2326008 ई–मेल ceoahmedn-stats@nic.in
वेबसाइट– web site-ahmednagar.cantt.gov.in

No.ANR/Main.works/2026-27 Date- 26/10/2026

## CORRIGENDUM

With reference to E-Tender Notice No. ANR/Main. Works/2026-27 dated 23/10/2026, the following corrections are hereby made:

1. The last date for submission of the online tender shall be read as 16/11/2026 instead of 15/11/2026.
2. The date of opening of the online tender shall be read as 18/11/2026 instead of 17/11/2026.

The online tender form, Notice Inviting Tender (NIT) and Financial Bid Format are available on the Central Public Procurement Portal (CPPP) at **https: //defproc.gov.in/nicgep/app.**

Contractors /Bidders/Firms are advised to visit the above website from time to time for any further changes or information.

**(Vikas Kumar)** | (विकास कुमार)
Chif Executive officer | मुख्य अधिशासी अधिकारी,
Ahilyanagar Cantonment Board | अहिल्यानगर छावनी परिषद

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकिचा विद्यार्थी यश पवार याची जपानमध्ये ३ महिन्यांच्या सशुल्क इंटर्नशिपसाठी निवड

नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाचा विद्यार्थी यश पवार याची जपानमधील एफडीआय, के.के.कंपनी येथे ३ महिन्यांच्या सशुल्क इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. यश हा २०२६ च्या पदवीधर बॅचमधील विद्यार्थी आहे.



या इंटर्नशिपमुळे यशला जपानमधील औद्योगिक कार्यपद्धती, आधुनिक तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यावसायिक अनुभव मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

महाविद्यालयातील जपानी भाषा उत्कृष्टता केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जपानी भाषा, जपानी संस्कृती आणि जपानमधील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले जाते. या केंद्राच्या समन्वयक प्रा. पूजा वैकर आणि जपानी भाषा प्रशिक्षक प्रा. वैदेही मुळे–पारनाईक यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकण्याची तसेच जपानमधील रोजगार व प्रशिक्षणाच्या संधींची माहिती मिळत आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांसाठी जागतिक स्तरावरील रोजगाराच्या आणि प्रशिक्षणाच्या संधींची दारे खुली होत आहेत.

यश पवार च्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे टेक्निकल डायरेक्टर प्रा. सुनील कल्हापुरे, डायरेक्टर जनरल डॉ. पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. सुजय विखे पाटील आणि मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच महाविद्यालयातील जपानी भाषा उत्कृष्टता केंद्राच्या समन्वयक प्रा. पूजा वैकर आणि जपानी भाषा प्रशिक्षक प्रा. वैदेही पारनाईक यांनी यशच्या यशात दिलेल्या मार्गदर्शन व योगदानाबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले.






नगर बाजारपेठेतील तपकीर गल्ली येथे माल खाली करताना अनेक वाहने रस्त्याच्या मध्येच लावलेली असतात त्यामुळे वाहतुकीची तासन तास कोंडी होवून नगरकरांना त्रास सहन करावा लागतो. याकडे शहर वाहतूक शाखा लक्ष देवून कारवाई करणार का असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. (छायाचित्र – धनेश कटारिया)

## अहिल्यानगर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग

वेबसाईट– www.amc.gov.in
इे–मेल– amc_anr@rediffmail.com

जा.नं. ५७८ दिनांक :–०८/१०/२०२५

### बाजार भावाबाबत कोटेशन दरपत्रक

कळविण्यात येते की, अहिल्यानगर महानगरपालिकेस पाणी पुरवठा विभागा करिता ७०० एम.एम. डी.आय.K–७ पाईप खरेदी करणे कामा करिता उत्पादक/ अधिकृत विक्रेता/ वितरक यांचेकडून कोटेशन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | मालाचा तपशील | परिमाण | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १ | ७०० एम.एम. व्यासाचे डी. आय K–७ पाईप खरेदी करणे (म. जी. प्रा. प्रमाणित व नामांकित कंपनीचे) | १० नग | |

१) रूपये पन्नास हजारा पेक्षा जास्त रक्कमेच्या कामास रक्कम रूपये ५०० चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून दयावा लागेल.

२) स्पेसिफिकेशन प्रमाणे कामाचा/मालाचा पुरवठा महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडे पोहोच करावा लागेल.

३) GST (जी.एस.टी.) क्रमांक, PAN (पॅन) क्रमांक असणे आवश्यक आहे. त्याशिवाय बीलाची रक्कम अदा केली जाणार नाही.

४) पुरवठादाराचे देयक फक्त ईसीएस/एनईएफटी द्वारेच प्रदान करण्यात येईल. त्यासाठी संबधीत पुरवठादाराने कोअर बँकींगची सुविधा असलेल्या बँकेतच खाते असणे बंधनकारक राहिल.

तरी सदर मालाचे बाजारभाव सिलबंद पाकीटात दिनांक ०२/११/२०२६ रोजी दु.१२.०० वाजेपर्यंत अहिल्यानगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडे समक्ष दाखल करावेत.

कळावे. दि.२७/१०/२०२६

उपायुक्त (कर)
अहिल्यानगर महानगरपालिका

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर ठरलेला असुन त्यापोटी आमच्या अशिलाकडून विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असुन सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता.२७/१०/२०२६.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, **मौजे खोसपुरी** येथील खालील वर्णनाची हंगामी बागायत शेतजमिन मिळकत –

**गट नं.९७ चे एकुण क्षेत्र १हे.४६आर याचा आकार १रु.५६पैसे. ही संपुर्ण शेतजमिन मिळकत.**

**यांसी चतुःसिमा खालील प्रमाणे –**

पुर्वस :– गट नं.८२/ब दक्षिणेस :– गट नं.९६
पश्चिमेस :– गट नं.९८ व ९९ उत्तरेस :– गट नं.९८ व ९९

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**

**१. आशाबाई सर्जेराव तिडके उर्फ वैशाली सर्जेराव तिडके,** रा. गावठाण, कुक्कडवेढे, ता.राहुरी, जि. अहिल्यानगर., **२.सुनिता सदाशिव वाखुरे लग्नानंतरचे नाव– सुनीता कैलास मोरे,** रा. ता.नेवासा, जि. अहिल्यानगर. **३.मुक्ताबाई रुस्तुम वाखुरे,** रा. बहिरवाडी, अहिल्यानगर., **४. अरुण रुस्तुम वाखुरे,**रा. वांजोळी, खोसपुरी, अहिल्यानगर., **५. चंद्रकांत रुस्तुम वाखुरे,** रा. बहिरवाडी, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर., **६.मिना कृष्णा गायकवाड,** रा.नेवासा बुद्रुक, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर. **७. अमोल लक्ष्मण गायकवाड,** रा. घोडंगांव, कुकाणा रोड, कौठा, अहिल्यानगर. **८. वैभव लक्ष्मण गायकवाड,** रा. कौठा, ता.नेवासा, जि. अहिल्यानगर., **९. लक्ष्मण कारभारी गायकवाड,** रा.कौठा, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर व **१०. अनिता नरेंद्र सुर्यवंशी,** रा. नेवरगांव, ता.गंगापुर, औरंगाबाद–४३१११०.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर. मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

# अहिल्यानगर शहरामध्ये २९ ऑक्टोबर रोजी एस.पी. बालसुब्रह्मण्यम यांच्या गीतांची मैफल

## "Mesmerizing SP' संगीतमय कार्यक्रम; सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य

नगर – भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ आणि पार्श्वगायक स्वर्गीय एस. पी. बालसुब्रह्मण्यम यांच्या अजरामर गीतांचा सुरेल नजराणा अनुभवण्याची संधी अहिल्यानगरकर रसिकांना मिळणार आहे. "90s Talkies' आणि "OrangeEvents' यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६. ३० वाजल्यापासून "Mesmerizing SP - Hits of S. P. Balasubrahmanyam' या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.




हा कार्यक्रम नगर–मनमाड रोडवरील माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे होणार आहे. एस. पी. बालसुब्रह्मण्यम यांनी आपल्या सुरेल आवाजातून हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक अजरामर गीते दिली. त्यांच्या लोकप्रिय गीतांच्या आठवणींना उजाळा देत संगीतप्रेमींना जुन्या हिंदी गीतांचा आनंद घेता यावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा एक भव्य कराओके ट्रॅक शो असून रसिकांना जुन्या हिंदी चित्रपटगीतांचा आनंद प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे.

या कार्यक्रमात गायिका राधिका आत्रे, डॉ. दीपा मोहोळे, डॉ. सत्तार सय्यद, ॲड. सचिन चंदनशिव आणि जालिंदर शिंदे हे गायक सादरीकरण करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन डॉ. राजीव सूर्यवंशी करणार आहेत.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. दमन काशीद, डॉ. गायत्री कुलकर्णी, डॉ. मोहोळे, प्राध्यापक रवींद्र काळे, ॲड. धनंजय वाघ यांनी सहकार्य केले आहे.

विशेष म्हणजे, या कार्यक्रमासाठी रसिकांना प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे. अहिल्यानगरमधील संगीतप्रेमींनी या सुरेल मैफलीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क जालिंदर शिंदे – ९८८१७ २५६९६

